cmyk

दैनिक

www.epaper.rajyaloktantra.com

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

● छत्रपती संभाजीनगर ● पुणे ● अहिल्यानगर ● जालना ● धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र | वर्ष–५ | अंक–२९९ | बुधवार दि.२५ फेब्रुवारी २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

## संपादकीय

### पाडा तिथे एसटी : घोषणेपलीकडील वास्तव आणि जबाबदारी

'गाव तिथे एसटी' ही घोषणा महाराष्ट्राच्या ग्रामीण विकासाचे प्रतीक मानली गेली. अनेक दुर्गम गावांना जगाशी जोडण्याचे काम एसटीने केले आणि ती केवळ प्रवासाची सुविधा नसून ग्रामीण जनजीवनाची जीवनवाहिनी ठरली. आता राज्याच्या परिवहन मंत्र्यांनी 'आदिवासी पाडा तिथे एसटी' ही नवी घोषणा करत छोट्या बसेस खरेदी करण्याचा निर्णय जाहीर केला आहे. ही घोषणा निश्चितच स्वागतार्ह आहे. कारण आदिवासी समाज आजही मूलभूत दळणवळण सुविधांपासून वंचित आहे. मात्र या घोषणेसोबत अनेक गंभीर प्रश्नही उभे राहतात.

# अवकाळी पावसाने शेतकरी संकटात !

## ताबडतोब नुकसानभरपाई द्या; विरोधकांची जोरदार मागणी

मुंबई । प्रतिनिधी

**राज्य विधीमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात मंगळवारी (दि.२४) काँग्रेस नेते आणि आमदार विजय वडेट्टीवार यांनी राज्यातील अवकाळी पावसामुळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांच्या नुकसानभरपाईची मागणी लाऊन धरली. सोबतच राज्यात अनेक भागांत झालेल्या गारपिटीमुळेसुद्धा रब्बी पिकांचे मोठे नुकसान झाल्याने शेतकऱ्यांच्या या गंभीर स्थितीवर त्यांनी तातडीने सभागृहात चर्चा करण्याची मागणी केली. गेल्या वर्षापासून शेतकरी आर्थिक अडचणीत असून नुकसानभरपाई, बोनस आणि पिकांच्या खरेदीचे पैसे अजून मिळाले नसल्याचे त्यांनी नमूद केले.**

वडेट्टीवार यांनी सांगितले की, कोकण, विदर्भ आणि मराठवाडा भागात नैसर्गिक आपत्तीमुळे मोठे नुकसान झाले. अनेक शेतकऱ्यांना अद्याप मदत मिळालेली नाही. गेल्या वर्षी जाहीर केलेला बोनस शेतकऱ्यांच्या खात्यात जमा झालेला नाही. तसेच २०२५ च्या हंगामातील शेतकऱ्यांच्या पिकाच्या खरेदीचे पैसेही प्रलंबित आहेत. तसेच ते पुढे म्हणाले, त्यामुळे शेतकरी कर्जबाजारी होत असून पुढील पेरणीसाठी पैसे उभे करणे कठीण झाले आहे. वाढते खर्च, कर्ज आणि कमी दर यामुळे ग्रामीण अर्थव्यवस्था अडचणीत आल्याचे त्यांनी सांगितले. सरकारने प्रत्यक्ष मदत करावी आणि आपली भूमिका स्पष्ट करावी, अशी मागणी त्यांनी केली. दरम्यान



यावेळी सभागृहात काही काळ गोंधळ निर्माण झाला होता. राज्यातील अनेक भागांना गेल्या दोन दिवसांत अवकाळी पाऊस आणि गारपिटीचा फटका बसला आहे. नागपूर, भंडारा, गोंदिया, यवतमाळ आणि नांदेड जिल्ह्यांत पाऊस झाला, तर काही ठिकाणी गारपीट झाली. यवतमाळ जिल्ह्यातील मारेगाव, आर्णी, महागाव आणि उमरखेड भागात हरभरा आणि गहू पिकांचे मोठे नुकसान झाले. सध्या हरभरा काढणी सुरू असल्याने नुकसान अधिक झाल्याचा अंदाज आहे. अनेक ठिकाणी वादळी वाऱ्यासह पाऊस आणि गारपीट झाल्याने गहू, मका, ज्वारी तसेच आंबा पिकांचे नुकसान झाले. परभणी जिल्ह्यातही अनेक भागांत ▶▶ पान २ वर

# जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुका पडणार लांबणीवर!

## ५० टक्के आरक्षण मर्यादा ओलांडलेल्या ठिकाणी निवडणुका घेण्यास सर्वोच्च न्यायालयाचा नकार

दिल्ली । वृत्तसंस्था

**राज्यातील ३४ स्थानिक स्वराज्य संस्थांपैकी जवळपास १२ संस्थांच्या निवडणूका पार पडल्या आहेत. त्यापैकी आणखी २२ स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूका होणे अद्याप बाकी आहे. मात्र यातील अनेक स्थानिक स्वराज्य संस्थामधील आरक्षणाची मर्यादा ५० टक्केहून अधिक ओलांडली आहे. त्यामुळे सर्वोच्च न्यायालयाने राज्यातील २२ जिल्हा परिषदा आणि पंचायत समितीच्या निवडणूका आता प्रलंबित करण्यात राहणार आहेत. विशेष म्हणजे सर्वोच्च न्यायालयाने या निवडणूका घेण्यास मनाई केल्याची माहीती पुढे येत आहे.**




महाराष्ट्राच्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीतील ओबीसी आरक्षणावर सर्वोच्च न्यायालयात सुनावणी पार पडली. या सुनावणीत सर्वोच्च न्यायालयाच्या अंतिम निर्णयाच्या अधीन राहून प्रलंबित निवडणूक घेण्यास परवानगी देण्याची मागणी राज्य सरकारकडून करण्यात आली होती.

मात्र, सर्वोच्च न्यायालयानं उर्वरित जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांच्या निवडणुका घेण्यास मनाई केली आहे. राहुल रमेश वाघ विरुद्ध केंद्र सरकार, महाराष्ट्र सरकार या मूळ याचिकेवर सुनावणी झाली. बांठिया समितीच्या अगोदर जी स्थिती होती त्यानुसार निवडणूक घेण्याचे आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिले होते. राज्य निवडणूक आयोगानं आरक्षण निश्चिती करताना ५० टक्क्यांची मर्यादा ओलांडली गेली होती. काही ठिकाणी निवडणुका देखील पार पडल्या. २२ जिल्हा परिषद आणि या जिल्ह्यांमधील पंचायत समितीत आरक्षणाची ५० टक्के मर्यादा ओलांडली गेली होती. त्यामुळं या ठिकाणच्या निवडणुका घेण्यास स्थगिती देण्यात ▶▶ पान २ वर

# अल्पसंख्याक विभागाचा खुलासा

## 'त्या' शाळांना प्रमाणपत्र वाटप झालेच नाहीत

मुंबई । प्रतिनिधी

राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे २८ जानेवारीला विमान अपघातात निधन झाले. त्यांच्या निधनानंतर संपूर्ण महाराष्ट्र शोकाकूल असतानाच मंत्रालयात काही फाईल्स वेगाने फिरल्या आणि राज्यातील तब्बल ७५ शाळांना अल्पसंख्याक दर्जा देण्याचा निर्णय घेण्यात आला. अजित पवार यांच्या मृत्यूनंतर घाईगडबडीने ७५ शाळांना अल्पसंख्याक दर्जा का देण्यात आला? यावरून विरोधकांनी महायुती सरकारवर टीकेची झोड उठवली. त्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या निर्णयाला स्थगिती दिली होती. यावर आता अल्पसंख्याक विकास विभागाने खुलासा केला आहे.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनाच्या दिवशी अल्पसंख्याक विकास विभागामार्फत कोणत्याही नवीन फाईल्सवर किंवा प्रमाणपत्रांवर डिजिटल स्वाक्षरी करण्यात आलेली नाही, असा खुलासा अल्पसंख्याक विकास विभागाने केला आहे. तसेच त्या दिवशी कोणतेही प्रमाणपत्र वाटप झालेले नसल्याचेही विभागाने नमूद केले आहे. अल्पसंख्याक दर्जा प्रदान करण्याची संपूर्ण प्रक्रिया ही ऑनलाईन, पारदर्शक असून २७ मे २०१३ च्या शासन निर्णयातील तरतुदींनुसारच राबवली जाते. अर्जांची जिल्हास्तरावर ▶▶ पान २ वर

# हैदराबाद गॅझेटियरसाठी नवीन समिती

## विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर समिती अध्यक्ष

मुंबई । प्रतिनिधी

मराठा आरक्षणाच्या मागणीसंदर्भात मनोज जरांगे यांच्या मुंबईतील आंदोलनानंतर राज्य सरकारने हैदराबाद गॅझेटियर लागू करून मराठा समाजाला ओबीसी प्रमाणपत्र देण्याचे आश्वासन दिले होते. मात्र तब्बल सहा महिन्यांनंतरही या संदर्भातील स्पष्ट कार्यपद्धती निश्चित करण्यात आलेली नाही. त्यामुळेच कुणबी प्रमाणपत्रांसाठी अर्ज कमी येत आहेत, अशी कबुली सरकारने काढलेल्या आदेशातून दिली आहे.

सरकारने मान्य केले आहे की, कार्यपद्धती निश्चित नसल्यामुळे अर्ज कमी प्रमाणात दाखल होत आहेत,




तसेच प्रमाणपत्रांचे वाटपही अत्यल्प झाले आहे. या पार्श्वभूमीवर आता नवी समिती स्थापन करण्यात आली असून ही समिती आवश्यक कार्यपद्धती तयार करणार आहे. विभागीय आयुक्तांच्या देखरेखीखाली समिती छत्रपती संभाजीनगर विभागीय आयुक्त कार्यालयाच्या देखरेखीखाली ही समिती स्थापन करण्यात आली आहे.

संबंधित समिती हैदराबाद गॅझेटियरच्या आधारे मराठा समाजातील पात्र व्यक्तींना कुणबी अथवा मराठा–कुणबी प्रमाणपत्र देण्यासाठी आवश्यक असलेली सविस्तर कार्यपद्धती ठरवणार आहे. कार्यपद्धती तयार झाल्यानंतर ती राज्य सरकारकडे मंजुरीसाठी पाठवण्यात येईल. मंजुरीनंतरच प्रमाणपत्र वितरण प्रक्रियेला गती मिळेल, अशी माहिती अधिकृत आदेशातून समोर आली आहे. सरकारने आंदोलनानंतर तात्काळ निर्णय घेण्याचे आश्वासन दिले होते. मात्र सहा महिन्यांनंतरही कार्यपद्धती निश्चित न झाल्याने प्रशासनाच्या दिरंगाईवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. ▶▶ पान २ वर

# विधानसभेत ११,९९५ कोटी रुपयांच्या पुरवणी मागण्या सादर

मुंबई । प्रतिनिधी

**महाराष्ट्राच्या विधिमंडळाचं अर्थसंकल्पीय अधिवेशन २३ फेब्रुवारीपासून सुरु झालं आहे. मंगळवारी राज्य सरकारच्यावतीनं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत ११,९९५ कोटी रुपयांच्या पुरवणी मागण्या सादर केल्या. तर, राज्य सरकारच्या या निर्णयावर काँग्रेस नेत्यांनी टीका केली आहे. अर्थसंकल्पीय अधिवेशन ऐवजी पुरवणी अधिवेशन असे एकच नाव द्यावे, असा सल्ला देखील महायुती सरकारला दिला आहे.**

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत पुरवणी मागण्या सादर केल्या. महसुली खात्यावरील एकूण खर्च – ५,७४८ कोटी रुपये तर भांडवली खात्यावरील खर्च ६००३ कोटी रुपये आहे. या पुरवणी मागण्यांमधील प्रमुख तरतुदी म्हणजे कोणत्या



खात्यांसाठी आहेत याची सविस्तर माहिती खालील प्रमाणे आहे. ऊर्जा, कामगार, उद्योग आणि खनिकर्म विभागासाठी ४,०६६ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. यापैकी सर्वाधिक ३२६२ कोटी रुपये वीज क्षेत्रासाठी, तर ८०३ कोटी रुपये ग्राम आणि लघु उद्योगांसाठी राखीव ठेवण्यात आले आहेत. पाणीपुरवठा आणि स्वच्छता विभागासाठी ▶▶ पान २ वर

# लाडक्या बहिणींसाठी गुड न्यूज!

## जानेवारीचे १ हजार ५०० रुपये खात्यात जमा होण्यास सुरुवात

पुणे । प्रतिनिधी

राज्याच्या मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेअंतर्गत जानेवारी २०२६ महिन्याचा १ हजार ५०० रुपयांचा हप्ता लाभार्थी महिलांच्या खात्यात जमा होण्यास सुरुवात झाली आहे. सामाजिक न्याय विभागाने निधी वर्ग केल्यानंतर महिला व बालविकास विभागाने वितरण प्रक्रिया सुरू केली आहे. पुढील काही दिवसांत सर्व पात्र महिलांच्या खात्यात पैसे जमा होणार असल्याची माहिती महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी दिली.

ई–केवायसी पूर्ण केलेल्या महिलांनाच या योजनेचा लाभ दिला जाणार असून त्यासाठी ३१ मार्चपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. जानेवारीचा हप्ता देण्यासाठी सामाजिक न्याय विभागाने १८ फेब्रुवारी रोजी सुमारे ९८ कोटी रुपये महिला व बालविकास विभागाकडे वर्ग केले होते.



ही रक्कम मिळाल्यानंतर २३ फेब्रुवारीपासून प्रत्यक्ष खात्यांमध्ये पैसे जमा करण्याची प्रक्रिया सुरू झाली. महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी पुढील दोन–तीन दिवसांत सर्व पात्र महिलांच्या आधार जोडलेल्या खात्यात पैसे जमा होतील, असे सांगितले. मात्र फेब्रुवारी महिन्याचा हप्ता कधी दिला जाईल, याबाबत अद्याप माहिती देण्यात आलेली नाही. डिसेंबर २०२५ चा हप्ता जानेवारीच्या मध्यात देण्यात आला होता. त्या वेळी सुमारे १ कोटी ६० लाख ▶▶ पान २ वर

# गोदावरीच्या पात्रात सोनं शोधण्यासाठी झुंबड

छ. संभाजीनगर। प्रतिनिधी

जिल्ह्यातील पैठण येथे सध्या एक वेगळंच चित्र पाहायला मिळत आहे. नाथषष्ठी उत्सवाच्या पार्श्वभूमीवर गोदावरी नदीच्या पात्रातील पाणी कमी करण्यात आले आहे. पाणी ओसरल्यानंतर नदीचे विस्तीर्ण पात्र उघडे पडले असून, या गाळामध्ये सोनं शोधण्यासाठी शेकडो नागरिकांनी नदीकाठ गाठला आहे. हातात चाळण्या, टोपल्या आणि काही जणांकडे लहान फावडी घेऊन आबालवृद्ध नदीच्या गाळात नशीब आजमावताना दिसत आहेत. सकाळपासूनच नदीपात्रात लोकांची गर्दी होत असून, काही जण गाळ चाळून



त्यातून सोन्याचे कण किंवा दागिन्यांचे तुकडे मिळतात का याचा शोध घेत आहेत.

पैठणमधील नाथ मंदिर परिसराच्या पाठीमागे असलेल्या दशक्रिया विधी घाटावर वर्षभर शेकडो अंत्यविधी आणि दशक्रिया विधी पार पडतात. स्थानिक श्रद्धेनुसार, या विधीवेळी मृत व्यक्तीसोबत अर्पण केलेल्या सोन्या–चांदीच्या वस्तू किंवा अस्थींसोबत विसर्जित केलेले दागिने नदीच्या पात्रात साचत जातात. वर्षभर पाण्याखाली राहणारा हा गाळ पाणी कमी झाल्यानंतर उघडा पडतो. याच पार्श्वभूमीवर सोनं मिळण्याच्या आशेने नागरिक मोठ्या संख्येने नदीत उतरले आहेत. काहींना किरकोळ धातूचे तुकडे मिळाल्याची चर्चा असली, तरी बहुतांश जण नशीबाच्या भरवशावर गाळ चाळताना दिसत आहेत.दरम्यान, नदीपात्रात वाढती गर्दी पाहता सोन्याच्या शोधाची ही झुंबड परिसरात चर्चेचा विषय ठरली आहे.छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील पैठण येथे नाथषष्ठी उत्सवाच्या पार्श्वभूमीवर गोदावरी नदीच्या पात्रातील पाणी कमी करण्यात आले आहे. पाणी ओसरल्यामुळे नदीचे पात्र मोठ्या प्रमाणात उघडे पडले असून, या उघड्या पडलेल्या पात्रात सोने शोधण्यासाठी शेकडो लोकांची एकच झुंबड उडाली आहे. एरवी पाणी जास्त असल्याने हे दागिने शोधणे कठीण असते, मात्र आता पाणी कमी झाल्यामुळे हा गाळ उघडा पडला आहे. त्यामुळेच शेकडो लोकं सोनं शोधण्यासाठी नदीत उतरल्याने चित्र पाहायला मिळत आहे.

## थोडक्यात...

### सहकारी संस्थांच्या निवडणुक स्थगिती उठली

पुणे: राज्यातील बारा जिल्ह्यात नुकत्याच पार पडलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकां दरम्यान स्थगित केलेल्या राज्यातील अ व ब वर्ग सहकारी संस्थांच्या निवडणुकीवरील स्थगिती शासनाने मंगळवारी (दि. २४) उठविली आहे. महाराष्ट्र राज्य सहकार निवडणूक प्राधिकरणाचे सचिव अशोकराव गाडे यांनी मंगळवारी एका आदेशान्वये राज्यात स्थगित झालेल्या सहकारी संस्थांच्या निवडणुका आहे. त्या टप्प्यावर सुरू करण्याचे निर्देश दिले आहेत. केवळ न्यायालयीन आदेशामुळे स्थगित झालेल्या निवडणुका यामध्ये अपवाद करण्यात आलेल्या आहेत. दरम्यान, या शासन निर्णयामुळे गोकुळच्या निवडणुकीची रणधुमाळी लवकरच सुरू होणार आहे. आठवड्याभरात गोकुळच्या निवडणुकीचा महत्त्वाचा टप्पा असलेला मतदार यादी तयार करण्याचा कार्यक्रम जाहीर होण्याचे संकेत आहेत.

### कंत्राटदारांचे तब्बल ७७ हजार कोटी थकले

मुंबई : राज्य सरकारच्या तिजोरीत निर्माण झालेल्या खडखडाटामुळे कंत्राटदारांचे तब्बल ७७ हजार कोटी रुपयांचे देणे थकल्याचा गंभीर आरोप राज्य कंत्राटदार महासंघाने केला आहे. विशेष म्हणजे शासनाने दिलेले चेकही ट्रेझरीमध्ये वटत नसल्यामुळे राज्याची आर्थिक स्थिती अत्यंत बिकट झाली असून कंत्राटदारांनाही मोठे आर्थिक संकट आले असून त्वरित बिलाची रक्कम मिळाली नाही तर आंदोलनाचा इशारा कंत्राटदार संघटनेकडून देण्यात आला आहे. राज्याच्या तिजोरीत खडखडाट झाल्याची वस्तुस्थिती समोर आली आहे. राज्य कंत्राटदार महासंघाचे प्रदेशाध्यक्ष मिलिंद भोसले यांच्या मते, राज्यातील कंत्राटदारांचे तब्बल ७७ हजार कोटी रुपयांची बिले थकली आहेत. सरकारच्या काही विभागांनी थकबाकीचे चेक दिले आहेत.

### एक लिटर दुधापेक्षा एक लिटर देशी दारू महाग

मुंबई: राज्यात एक लिटर दुधापेक्षा एक लिटर देशी दारूची किंमत जास्त असल्याचे सांगत सुधीर मुनगंटीवार यांनी सभागृहाचे लक्ष वेधून घेण्याचा प्रयत्न केला. सरकार कर्मचाऱ्यांच्या पगारासाठी सातवा, आठवा वेतन आयोग स्थापन करते. ऊस उत्पादक शेतकऱ्यांना योग्य न्याय देण्यासाठी आपण एफआरपीच्या, केंद्राच्या माध्यमातून दर ठरवतो. दुधाच्या दराचा शास्त्रशुद्ध अभ्यास करत त्यासाठी लागणारा खर्च विचारत घेत अशी एक समिती स्थापन करावी; जी दर ३ वर्षांनी अहवाल देईल आणि त्या अहवालाच्या आधारावर दूध दराबाबत निर्णय घेण्यात येईल. दूध उत्पादक शेतकरी जगला पाहिजे, जनावरे जगली पाहिजेत. हा दुधाचा व्यवसाय मजबूत करण्यासाठी तीन वर्षांच्या उत्पादन खर्चाचा आढावा घेण्यासाठी समिती नेमणार का? असा प्रश्न मुनगंटीवार यांनी दुग्धविकासमंत्र्यांकडे केला.

### वासनांध भावाचा बहिणीवर अत्याचार

नागपूर: मोबाइलवर अश्लील चित्रफीत पाहून सख्ख्या भावाने अल्पवयीन बहिणीवर बलात्कार केला. ती गर्भवती राहिल्यानंतर हा धक्कादायक प्रकार समोर आला. नात्याला काळिमा फासणाऱ्या भावाविरोधात पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. ही घटना कळमेश्वर पोलिस ठाण्याच्या हद्दीत उघडकीस आली. याप्रकरणी पोलिसांनी १६ वर्षीय मुलाविरुद्ध बलात्कारासह विविध कलमांन्वये गुन्हे दाखल केले.

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती,

बीड, दि.२४ फेब्रुवारी २०२६

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| पीक | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: १२५.५० क्विंटल | २,१०० | ३,००१ | २,४५६ |
| ज्वारी/हायब्रिड: ७२.५० क्विंटल | २,१०० | ४,६८१ | ३,२६४ |
| मका/लोकल: ३.५० क्विंटल | १,५०० | १,५०० | १,५०० |
| तूर : ३३.५० क्विंटल | ६,९५० | ७,५५२ | ७,३२९ |
| उडीद : १.५० क्विंटल | ४,२०० | ४,२०० | ४,२०० |
| बाजरी: १४.०० क्विंटल | २,१९५ | ३,१९१ | २,८७७ |
| मुग: १.०० क्विंटल | ५,४०० | ५,४०० | ५,४०० |
| सोयाबीन: १४.५० क्विंटल | ५,२५० | ५,२५० | ५,२५० |
| हरभरा: ५.०० क्विंटल | ५,००१ | ५,१४० | ५,०७० |

cmyk

## अग्रलेख

# पाडा तिथे एसटी : घोषणेपलीकडील वास्तव आणि जबाबदारी

'गाव तिथे एसटी' ही घोषणा महाराष्ट्राच्या ग्रामीण विकासाचे प्रतीक मानली गेली. अनेक दुर्गम गावांना जगाशी जोडण्याचे काम एसटीने केले आणि ती केवळ प्रवासाची सुविधा नसून ग्रामीण जनजीवनाची जीवनवाहिनी ठरली. आता राज्याच्या परिवहन मंत्र्यांनी 'आदिवासी पाडा तिथे एसटी' ही नवी घोषणा करत छोट्या बसेस खरेदी करण्याचा निर्णय जाहीर केला आहे. ही घोषणा निश्चितच स्वागतार्ह आहे. कारण आदिवासी समाज आजही मूलभूत दळणवळण सुविधांपासून वंचित आहे. मात्र या घोषणेसोबत अनेक गंभीर प्रश्नही उभे राहतात. घोषणेचे आकर्षण वेगळे आणि तिची प्रत्यक्ष अंमलबजावणी वेगळी. यातील अंतर भरून काढण्याची खरी कसोटी आता सरकारसमोर आहे.

एसटी महामंडळाची सध्याची आर्थिक स्थिती पाहता ही घोषणा कितपत वास्तवात उतरू शकेल, हा पहिला आणि महत्त्वाचा प्रश्न आहे. महामंडळ हजारो कोटींच्या तोट्यात असल्याचे वारंवार सांगितले जाते. कर्मचाऱ्यांचे वेतन थकलेले आहे, भविष्य निर्वाह निधीचे हप्ते नियमित भरले जात नाहीत, डिझेल दरवाढीचा मोठा फटका बसतो आहे आणि जुन्या गाड्यांच्या दुरुस्तीवर प्रचंड खर्च करावा लागतो आहे. कर्मचाऱ्यांना त्यांच्या हक्कासाठी आंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागतो, ही परिस्थिती कोणत्याही सार्वजनिक संस्थेसाठी चिंताजनक आहे. महामंडळाने थकीत देणी फेडण्यासाठी सरकारकडे शेकडो कोटी रुपयांची मागणी केली असताना त्यातील केवळ काही हिस्सा उपलब्ध करून देण्यात आल्याचे वृत्त समोर आले होते. अशा स्थितीत नवीन बसेस खरेदीसाठी आवश्यक निधी कोठून आणि कसा उपलब्ध होणार, हा प्रश्न अनुत्तरित आहे. आधी कर्मचाऱ्यांची देणी आणि अस्तित्वातील सेवा सुदृढ करणे की नवीन घोषणा राबवणेया प्राधान्यक्रमाचा स्पष्ट आराखडा सरकारने जनतेसमोर ठेवणे आवश्यक आहे.

घोषणेचा दुसरा महत्त्वाचा पैलू म्हणजे पायाभूत सुविधांचा अभाव. छोट्या बसेस खरेदी करण्याचा निर्णय म्हणजे जिथे अरुंद रस्ते आहेत तिथपर्यंत सेवा पोहोचवण्याचा प्रयत्न होऊ शकतो. पण अनेक आदिवासी पाड्यांपर्यंत आजही कोणताही पक्का रस्ता नाही. काही ठिकाणी फक्त पायवाटा आहेत, तर काही ठिकाणी नाले, ओढे, चिखल आणि दगडी चढ–उतार पार करावे लागतात. अशा ठिकाणी बस पोहोचवण्यासाठी केवळ बस खरेदी करून चालणार नाही, तर रस्ते, छोटे पूल, सांडवे आणि सुरक्षित मार्गांची उभारणी अपरिहार्य आहे. त्यामुळे 'पाडा तिथे एसटी' ही घोषणा प्रत्यक्षात आणायची असेल तर ती केवळ परिवहन खात्यापुरती मर्यादित न ठेवता सार्वजनिक बांधकाम, ग्रामविकास आणि आदिवासी विकास या सर्व विभागांच्या समन्वयातून राबवावी लागेल.

या घोषणेचे सामाजिक महत्त्व मात्र अनन्यसाधारण आहे. दळणवळणाच्या अभावामुळे आदिवासी समाजाला रोजच्या जीवनात असंख्य अडचणींना सामोरे जावे लागते. गंभीर अवस्थेतील रुग्णांना खाटेवर किंवा झोळीत टाकून किलोमीटरच्या अंतरावर नेण्याच्या घटना अजूनही घडतात. अनेकदा रुग्ण वाटेतच प्राण सोडतात किंवा गर्भवती महिलांना वेळेवर वैद्यकीय मदत मिळत नाही. शाळकरी मुलांना शिक्षणासाठी नाले ओलांडत, घसरड्या पायवाटांवरून जीव धोक्यात घालून जावे लागते. या अडचणी केवळ वाहतुकीच्या नसून त्या आरोग्य, शिक्षण आणि सामाजिक प्रगतीच्या मूलभूत प्रश्नांशी जोडलेल्या आहेत. एसटी सेवा नियमित झाली तर या समाजाच्या जीवनमानात मोठा सकारात्मक बदल घडू शकतो.

यासोबतच एसटी ही केवळ वाहतूक सेवा नसून राज्याच्या सामाजिक बांधिलकीचे प्रतीक आहे, हे विसरता कामा नये. नफा–तोट्याच्या गणितापलीकडे जाऊन दुर्गम भागांना जोडण्याचे काम सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचे असते. मात्र त्यासाठी आर्थिक शिस्त, पारदर्शक नियोजन आणि दीर्घकालीन धोरण आवश्यक आहे. केवळ घोषणा करून किंवा काही बसेस खरेदी करून हा प्रश्न सुटणार नाही. बसेसच्या देखभालीसाठी निधी, प्रशिक्षित कर्मचारी, नियमित इंधन पुरवठा आणि योग्य मार्ग नियोजन याची हमी द्यावी लागेल. अन्यथा काही काळानंतर या बसेस बंद पडण्याचा किंवा सेवा अनियमित होण्याचा धोका नाकारता येणार नाही.

सरकारने या घोषणेच्या निमित्ताने एसटी महामंडळाच्या एकूणच पुनरुत्थानाचा व्यापक आराखडा तयार करणे गरजेचे आहे. आर्थिक मदत, व्यवस्थापन सुधारणा, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर आणि ग्रामीण भागासाठी विशेष अनुदान योजना यांचा समावेश असलेले धोरण राबवले गेले तरच एसटी पुन्हा सक्षम होऊ शकते. आदिवासी पाड्यांपर्यंत सेवा पोहोचवण्याची घोषणा ही त्या व्यापक सुधारणेचा एक भाग असावी, केवळ प्रतीकात्मक निर्णय नसावा.

आदिवासी समाजाने वर्षानुवर्षे उपेक्षा सहन केली आहे. त्यांच्या जीवनातील अडचणींची खरी जाणीव व्हायची असेल तर त्या पाड्यांवर जाऊन प्रत्यक्ष परिस्थिती पाहावी लागेल. 'पाडा तिथे एसटी' ही घोषणा त्या वेदनांची दखल घेण्याची सुरुवात ठरू शकते. मात्र ती केवळ कागदावर किंवा भाषणांत मर्यादित राहिली तर ती आणखी एक अपूर्ण आश्वासन ठरेल. घोषणेचे खरे यश बसेसच्या चाकांमध्ये नसून त्या चाकांनी आदिवासींच्या जीवनात निर्माण केलेल्या बदलात मोजले जाईल. सरकारने आता शब्दांपलीकडे जाऊन कृतीची जबाबदारी पार पाडण्याची वेळ आली आहे.

---

# पाथर्डीत वाळू माफियांचा गुंडाराज महसूल प्र.विना कार्यवाही अनभिज्ञ

## महसूल प्रशासनाचा प्रति ४० ते ५० हजार हप्ता घेणारा गुंडाप्पा कोण?



शासनाच्या नैसर्गिक साधन संपत्तीचे जतन करणे हे महसूल प्रशासनाचे कर्तव्य आहे परंतु पाथर्डी तालुक्यात न दिसणारे गुंडाराज सुरू असून इथे महसूल प्रशासनातील एक मोठा नायब तहसीलदार गुंडाप्पा ज्याने आतापर्यंत बेकायदेशीर करोडो रुपयांची मालमत्ता वाळूमाफिया मुरूम माफिया ग्रामीण भागातील वाळू व मुरूम तस्करी करणारे एजंट विनोद यांच्या माध्यमातून कमवली आहे या मोठ्या बोक्याचा कायदेशीर बंदोबस्त करण्याची आवश्यकता आहे त्या संदर्भात लवकरच या नायब तहसीलदाराचा ओम भट स्वाहा केला जाईल

–( किसन आव्हाड )

पाथर्डी । प्रतिनिधी

पाथर्डी तालुक्यातील मीरी करंजी तिसगाव कोरडगाव टाकळीमानुर येळी खरवंडी कासार मीडसांगवी इत्यादी महसुली भागात सर्रासपणे शासनाच्या नैसर्गिक संपत्ती असलेल्या अवैध वाळू मुरूम उत्खनन केले जात आहे यास पाथर्डी तालुक्यातील महसूल प्रशासनातील एक बडा नायब तहसीलदार मोठा आका व गुंडाप्पा असल्याचे बोलले जात आहे तो बोका त्याच्या प्रत्येक महसुली गावातून मुरूम माफिया व वाळू माफिया या एजंट विनोदच्या माध्यमातून प्रति ट्रॅक्टर सात हजार रुपये हप्ता घेत आहे त्याच्या आशीर्वादाने पाथर्डी तालुक्यात जवळपास ५० हून अधिक वाळू आणि मुरमाचे बेकायदेशीर ट्रॅक्टर हायवा चालू आहेत तसेच काही खास एजंट विनोदच्या माध्यमातून रात्री किंवा पहाटे वाळूची किंवा मुरुमाची तस्करी होत असल्याची टीप मिळाल्यास बेकायदेशीर धाड टाकून वाळू माफिया व मुरूम माफिया या गुंडांशी तडजोड करून तब्बल ४० ते ५० हजार रुपयांची मनीभाई स्वीकारत आहे यामुळे या पाथर्डी तालुक्यातील वाळू माफीयांचा व मुरूममाफीयांचा एका बडा आका नायब तहसीलदार जो स्वतः गुंडाप्पा आहे हा गुंडाप्पा बेकायदेशीरपणे करोडो रुपयांची मालमत्ता जमवत आहे यामुळे पाथर्डी तालुक्यात रॉयल्टी न भरता महाराष्ट्र शासनाच्या पंतप्रधान आवास योजने अंतर्गत ग्रामीण भागात सुरू असलेले घरकुलाचे बांधकाम याचा फायदा घेत बेकायदेशीर चाललेल्या वाळू तस्करी व मुरूम तस्करी या अंदाधुंदी तस्करीवर कायदेशीर कडक कारवाई करण्याची मागणी किसनराव आव्हाड यांनी केली आहे.

---

# माय मराठीचा गौरव महोत्सावामध्ये बापुराव वऱ्हाडे यांच्या पुस्तकाचे प्रकाशन

**माजलगाव । प्रतिनिधी**

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या २४ फेब्रुवारी रोजी २०२६ मध्ये चालू असलेल्या ''माय मराठीचा गौरव'' या महोत्सवाच्या पहिल्या दिवशीच्या उद्घाटन समारंभात मराठी भाषा गौरव दिनाचे औचित्य साधून माजलगाव तालुक्यातील मोठेवाडीचे भूमिपुत्र बापुराव वऱ्हाडे यांच्या शोध कादंबरीची मीमांसा या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले.**



मराठी भाषा व वाङ्मय विभाग आणि विद्यार्थी विकास विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित प्राचार्य, नरहर कुरुंदकर व्याख्यानमाला या माय मराठीचा गौरव महोत्सावामध्ये उद्घाटन समारंभात कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे प्रसिद्ध लेखक व तज्ज्ञ पक्षी निरीक्षक माणिक पुरी यांच्या हस्ते व छत्रपती संभाजीगरचे अपर आयुक्त कार्यालयाचे के.के.भधाने (तहसीलदार), नायब तहसीलदार धावणे, मराठी विभागाचे विभागप्रमुख प्रा. डॉ.दासू वैद्य व विद्यार्थी कल्याण मंडळाचे संचालक डॉ. कैलास अंभुरे या मान्यवरांच्या उपस्थितीत बापुराव वऱ्हाडे यांच्या शोध कादंबरीची मीमांसा या संदर्भ ग्रंथांचे प्रकाशन करण्यात आले. प्रस्तुत कार्यक्रमाचे प्रास्ताविक मराठी विभागाचे विभागप्रमुख प्रा.डॉ. दासू वैद्य सर यांनी केले. सुत्रसंचलन केशरचंद राठोड यांनी केले तर कार्यक्रमाचे आभार मीरा गायके यांनी व्यक्त केले. या कार्यक्रमासाठी मराठी विभागातील विद्यार्थी, संशोधक विद्यार्थी, अभ्यासक, मान्यवर आणि मराठी भाषेवर प्रेम करणारे सर्व रसिक श्रोते उपस्थित होते. या सर्वांच्या उपस्थितीत बापुराव वऱ्हाडे यांच्या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले.त्याबद्दल त्यांचे मराठी विभागाच्यावतीने सत्कार करून अभिनंदन करण्यात आले.

---



# जालन्यात ८३३ वाहनावर कारवाई ८ लाखाचा दंड वसूल

**जालना । प्रतिनिधी**

**जालना शहरात मोटार कायदयानूसार राबविली विशेष मोहीम ८३३ वाहणांवर कारवाई करण्यात आली असून एकूण ८४७२५० रुपयांचा दंड आकरण्यात आला आहे.**

जालना शहरात मोटार वाहन कायदयाची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी जिल्हा पोलीस अधिक्षक मा. श्री अजय कुमार बन्सल , अपर पोलीस अधिक्षक मा.श्री आयूष नोपाणी यांनी निर्देश दिले त्यानूसार आज दिनांक २४/०२/२०२६ रोजी १६.०० ते १९.०० वाजे पावेतो उपविभागीय पोलीस अधिकारी श्री अनंत कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली उपविभागातील वाहतूक शाखेचे प्रताप इंगळे व त्यांचे पोलीस अंमलदार सदरबाजार पोस्टे पोनि भारती जालना तालूका पोनि श्री साबळे कदीम जालना पोनि शेवाळे चंदनझिरा पोनि पवार जिवाशा सपोनि चातूरे यांच्या अधिपत्याखाली असलेल्या स्टॉपसह जालना शहरात विशेष मोहीम राबविण्यात आली सदर मोहीमेमध्ये एकूण २५ पॉइंट वर वैरेकेटससह अधिकारी व पोलीस अंमलदार नेमण्यात आले होते सदर मोहीमेमध्ये ११ अधिकारी ९८ पोलीस अंमलदार व एक आरसीपी पथक व २० होमगार्ड यांनी सहभाग घेतला सदर मोहीमेध्ये एकूण ८३३ वाहनांवर कारवाई करण्यात येवून ८४७२५० रूपयाचा दंड आकरण्यात आला आहे. सदरची मोहीम यापूढे सूध्दा वरिष्ठांच्या आदेशानूसार राबविण्यात येणार आहे तरी सर्व नागरिकांनी मोटार वाहन कायदयाचे पालन करावे.

---

## पान १ वरून...

### अवकाळी पावसाने

पावसामुळे हरभरा, ज्वारी, गहू आणि करडई पिकांचे नुकसान झाले. बीड जिल्ह्यातील वडवणी आणि धारूर तालुक्यांत ज्वारी, बाजरी, गहू, हरभरा, भाजीपाला तसेच फळपिकांचे नुकसान झाले आहे. कोकणात हवामान बदलामुळे आधीच काजू आणि आंबा पिकांना फटका बसला होता. आता अवकाळी पावसामुळे फळगळ होऊन नुकसान वाढण्याची शक्यता आहे. रत्नागिरी आणि फोंडाघाट परिसरात पावसामुळे बागायतदार शेतकरी चिंतेत आहेत. दरम्यान, विधानमंडळाचे कामकाज अधिक पारदर्शक करण्यासाठी डिजिटल ट्रॅकिंग प्रणाली सुरू करण्याची माहिती सभागृहात देण्यात आली. या प्रणालीमुळे प्रश्न, विधेयके आणि चर्चेची माहिती ऑनलाइन उपलब्ध होणार आहे.

-------------

### अल्पसंख्याक विभागाचा

पडताळणी झाल्यानंतरच छाननी करून प्रमाणपत्रे वितरित केली जातात, असे विभागाने नमूद केले आहे. विभागामार्फत कोणतेही अनधिकृत अथवा घाईघाईने कामकाज झाल्याचे वृत्त पूर्णपणे निराधार असून वस्तुस्थितीचा विपर्यास करणारे असल्याचा ठाम दावा विभागाने केला आहे.अजित पवार यांच्या निधनानंतर अवघ्या काही दिवसांत ७५ शिक्षण संस्थांना अल्पसंख्याक दर्जा देण्यात आल्याचे समोर आल्यानंतर मोठा राजकीय वाद निर्माण झाला होता. या प्रकरणावरून विरोधकांनी सरकारवर जोरदार टीका केली होती. राष्ट्रवादी शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनी प्रत्येक फाईलमागे मोठ्या प्रमाणावर पैशांची देवाणघेवाण झाल्याचा आरोप केला होता.

----------

### जिल्हा परिषद,पंचयात

आली होती. राज्य निवडणूक आयोगानं १२ जिल्हा परिषद आणि १२५ पंचायत समित्यांच्या निवडणुका पार पडलेल्या आहेत. उर्वरित २० जिल्हा परिषदांच्या आणि उरलेल्या पंचायत समित्यांच्या निवडणुका अनिश्चित काळासाठी प्रलंबित राहण्याची शक्यता आहे. राज्यातील ५० टक्के आरक्षण मर्यादा ओलांडलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांवर सर्वोच्च न्यायालयानं मनाई कायम ठेवली आहे. राज्य सरकारच्यावतीनं तुषार मेहता यांनी अंतिम आदेशाच्या अधीन राहून निवडणूक घेण्यास परवानगी देण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली होती. मात्र, सर्वोच्च न्यायालयाने अशी परवानगी देता येणार नसल्याचे स्पष्ट केले. राज्यातील राहिलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका अनिश्चित काळासाठी प्रलंबित राहण्याची शक्यता आहे. प्रलंबित स्थानिक स्वराज्य संस्थांच्या बाबतीत सर्वोच्च न्यायालयाच्या अंतिम आदेशाच्या अधीन ठेवून निवडणुका घेतल्या जाऊ शकतात, अशी भूमिका राज्य सरकारच्या वतीने तुषार मेहता यांनी मांडली होती. मात्र, सुप्रीम कोर्टानं निवडणुका घेण्यास परवानगी दिलेली नाही. बांठिया आयोगाने दिलेल्या ओबीसी आरक्षणाच्या वैधतेवर सर्वोच्च न्यायालय कधीपासून सुनावणी सुरू करणार याकडे लक्ष लागलं आहे.

-----------

### विधानसभेत ११,९९५ कोटी

१४३१ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. तर ग्राम विकास विभागासाठी ७१ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. नियोजन विभाग ८० कोटी रुपये. अन्न व नागरी पुरवठा विभाग ५५.५२ कोटी रुपये. ओबीसी कल्याण विभाग २३.६४ कोटी रुपये. महसूल आणि वन विभाग १३२ कोटी रुपये, वैद्यकीय शिक्षण आणि औषधी द्रव्ये विभाग ३१ कोटी रुपये. राज्य सरकारकडून प्रत्येक अधिवेशनात पुरवणी मागण्या मांडल्या जात असल्याने विरोधकांनी यावर आक्षेप घेतला आहे. काँग्रेस नेते सचिन सावंत यांनी पोस्ट करत राज्य सरकारला काही सवाल विचारले आहेत.

--------------

### हैदराबाद गॅझेटियरसाठी

ही उदासीनता नाही तर आणखी काय? असा सवाल आता राजकीय व सामाजिक वर्तुळातून उपस्थित होत आहे. मराठा आरक्षणासंदर्भातील मंत्रिमंडळ उपसमितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे पाटील यांनी या दिरंगाईबाबत खुलासा करावा, अशी मागणी देखील होत आहे. दरम्यान, विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांनी याबाबतची भूमिका स्पष्ट केली असून समितीमार्फत कार्यपद्धती लवकरात लवकर निश्चित केली जाईल, असे संकेत दिले आहेत.दरम्यान, डिसेंबर २०२५ मध्ये समोर आलेल्या आकडेवारीनुसार, तीन महिन्यात मराठवाड्यातील केवळ ९८ जणांना ओबीसी प्रमाणपत्र मिळाल्याचं समोर आलं. मराठवाड्यातील आठ जिल्ह्यातून केवळ ५९४ अर्ज आले होते. पण, त्यातील केवळ ९८ जणांना अर्ज प्रमाणपत्र प्राप्त झाल्याची माहिती समोर आली. त्यावर मनोज जरांगे यांनीही नाराजी व्यक्त केली होती.

------------

### लाडक्या बहिणींसाठी

महिलांना लाभ मिळाला. ही योजना जुलै २०२४ मध्ये सुरू झाली तेव्हा सुमारे २ कोटी ४६ लाख महिलांनी नोंदणी केली होती. नंतर ई–केवायसी बंधनकारक केल्यावर सुमारे १ कोटी ९० लाख महिलांनी प्रक्रिया पूर्ण केली. मात्र कागदपत्रांतील चुका आणि अपूर्ण माहितीमुळे पात्र लाभार्थ्यांची संख्या कमी झाली. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतील सर्व पात्र लाभार्थ्यांना जानेवारी महिन्याचा सन्मान निधी वितरित करण्याची तांत्रिक प्रक्रिया २३ फेब्रुवारी पासून सुरू करण्यात आली आहे.

**ई–केवायसीला मुदतवाढ**

अनेक महिलांनी ई–केवायसी करताना चुकीची माहिती भरली होती. त्यामुळे शासनाने माहिती दुरुस्त करण्यासाठी ३१ मार्च २०२६ पर्यंत मुदत दिली आहे. या कालावधीत लाभार्थी महिलांना आपली माहिती सुधारता येणार आहे. ऑक्टोबरपासून ई–केवायसी प्रक्रिया सुरू झाली असली तरी तांत्रिक अडचणींमुळे मुदत वाढवण्यात आली. काही महिलांच्या खात्यात पैसे जमा झाले तरी त्यांना मोबाईलवर संदेश मिळत नाही. त्यामुळे लाभार्थींनी बँकेत जाऊन पासबुक अपडेट करावे किंवा मोबाईल ॲपवर खात्याची माहिती तपासावी, असे सांगण्यात आले आहे.

--------------

## पान ६ वरुन...

### धारूर तालुक्यातील डोंगर

वादळी वाऱ्यामुळे आंब्याचा मोहोर गळून पडला, तर काही ठिकाणी कच्ची फळेही झाडावरून खाली पडली. फळबागांनाही मोठा फटका बसला असून आंब्याच्या मोहोर आणि

कच्च्या फळांची गळती झाली आहे. काही भागांत शेतातील जनावरांच्या चाऱ्याचेही नुकसान झाले आहे. त्यामुळे दुहेरी संकट ओढावले आहे. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांनी तातडीने पंचनामे करून योग्य नुकसानभरपाई देण्याची मागणी प्रशासनाकडे केली आहे. स्थानिक शेतकरी संघटनांनीही शासनाने त्वरित मदत जाहीर करावी, अशी मागणी केली आहे. तसेच हवामान खात्याने अवकाळी पावसाचा

अचूक व वेळेवर अंदाज द्यावा, जेणेकरून शेतकऱ्यांना पिकांचे संरक्षणात्मक उपाय करता येतील, अशी मागणी करण्यात आली आहे.शेतात जनावरांसाठी साठवून ठेवलेला कोरडा चारा ओला झाला असून पशुपालकांपुढे अडचण निर्माण झाली आहे. आधीच वाढलेला उत्पादन खर्च आणि बाजारातील अनिश्चित दर यामुळे त्रस्त असलेल्या शेतकऱ्यांवर या नैसर्गिक संकटाने दुहेरी आघात केला आहे. वाऱ्याचा वेग मोठा असल्याने अनेक शेतांतील उभी पिके अक्षरशः आडवी झाली महसूल प्रशासनाने तत्काळ नुकसानग्रस्त भागाची पाहणी करून नुकसानभरपाई देण्याची मागणी तहसील प्रशासनाकडे माजी उपसरपंच सटवा अंडील यांनी केली आहे.

### पाटोदा तहसिलचा डबल

हा संशोधनाचा विषय ठरत आहे.

जनतेची मागणी:

तात्काळ जुन्या पंचनाम्यानुसार मदतीचे वाटप करा.

फेनपंचनाम्याचा घाट घालून वेळकाढूपणा करणाऱ्या दोषी अधिकाऱ्यांची चौकशी करा.पडझड आणि पशुधनाच्या नुकसानीचे थकीत पैसे तात्काळ बँक खात्यात जमा करा. प्रशासनाने जर आपली ही कासवगती आणि आडमुठी भूमिका बदलली नाही, तर पाटोदा तालुक्यातील जनता तहसील कार्यालयावर धडक मोर्चा काढण्याच्या तयारीत आहे. आता जिल्हाधिकारी या प्रकरणी लक्ष घालून पाटोदा प्रशासनाला शिस्त लावणार का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

### आष्टीच्या कृषी प्रदर्शनास

दाबेली पाणीपुरी भेळ कोल्हापुरी भेळ असे अनेक प्रकारचे स्टॉल या कृषी प्रदर्शनात होते अनेकांनी खाऊ गल्लीची मजा लुटली भीमराव धोंडे यांनी पुढच्या वर्षी देखील आणखी या कृषी प्रदर्शनाचे स्वरूप वाढवून यामध्ये नवनवीन दूध धंद्याविषयी, तसेच ए आय पद्धतीने शेती कशी केली जाऊ शकते अशा दोन्ही विषयाचे प्रदर्शनामध्ये सहभाग नोंदवावा अशी जनतेतून शेतकऱ्यातून तुम्हाला मागणी करण्यात येत आहे.

### चंद्रभागा पोद्दार लर्न स्कूलला

करून उपक्रमाची सुरुवात करण्यात आली.यावेळी विद्यार्थ्यांनी शाळा परिसराची स्वच्छता केली. तसेच विद्यार्थ्यांना संत गाडगेबाबा यांच्या जीवनकार्यावर आधारित माहितीपर चित्रपट दाखविण्यात आला. संत गाडगेबाबा यांचे स्वच्छतेविषयीचे विचार व सामाजिक कार्य विद्यार्थ्यांना समजावून सांगण्यात आले.फक्त आपले घर व शाळाच नव्हे तर आपल्या आजूबाजूचा परिसर, पर्यावरण स्वच्छ ठेवणे ही प्रत्येकाची सामाजिक जबाबदारी आहे. स्वच्छतेची सवय ही दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग बनली पाहिजे असे मार्गदर्शन अध्यक्ष अतुल ठोंबरे यांनी उपस्थितांना केले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये स्वच्छतेची जाणीव, पर्यावरणाविषयीची जबाबदारी व सामाजिक बांधिलकी अधिक दृढ होईल अशी अपेक्षा ठोंबरे यांनी यावेळी बोलताना व्यक्त केली.

---


जाहिर प्रगटन

**तालुका दंडाधिकारी तथा कार्यकारी दंडाधिकारी अंबड यांचे न्यायालय**

दुरध्वनी क्रमांक ०२४८३–२७५०२६

जा.क्र.२०२६/सेतु/कावि–५४ दिनांक–१२/०२/२०२६

अर्जदार श्रीमान/श्रीमती सतीश अशोक राक्षे रा. अंबड ता. अंबड जि.जालना यांनी यांच्या स्वतः च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
| --- | --- | --- | --- |
| | सप्तराज सतीष राक्षे | मुलगा | २५/०१/२०२२ |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक–१२/०२ /२०२६ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

स्वाक्षरित/–
तहसिलदार तथा कार्यकारी
दंडाधिकारी, अंबड



तहसील कार्यालय, गेवराई ता. गेवराई जि.बीड
(दंड विभाग)

दुरध्वनी क्र. ०२४४७–२६२१४५
क्र.२०२५/दंड/कावि– दिनांक १३.१०.२०२५

**जन्म नोंद आदेश मिळणे बाबत**

संदर्भ –१. शासन निर्णय क्रमांक जन्म नोंद २५२५/ईऑ९९११८१)/प्र.क्र.२२/कु.क नविन मंत्रालय मुंबई दिनांक १२.०३.२०२५

२. अर्जदार सय्यदद मसीउदिदन हसाहाकोदिदन रा. गेवराई ता. गेवराई यांचा अर्ज दिनांक १४.०८.२०२५

उपरोक्त संदर्भीय विषयाचे अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, प्रकरणात संदर्भ क्र ०२ नूसार अर्जदार सययद मसीउदिदन हसाहाकोदिदन रा. गेवराई ता. गेवराई यांनी अर्ज देवून अर्जदार यांचा जन्म दिनांक ०३.०५.१९७३ रोजी गेवराई येथे झाला असून अर्जदार यास कायदयाचे ज्ञान नसल्यामूळे जन्म नोंद करावयाचे राहून गेल्याने प्रकरणात जन्म आदेश मिळणे बाबत या कार्यालयास संदर्भीय अर्जाव्दारे विनंती करण्यात आलेली आहे.

करीता उकत अनुषंगाने शासन निर्णय क्रमांक जम्रना२५२५/ईऑ९९११८१)/प्र.क्र/कु.क नविन मंत्रालय मुंबई दिनांक १२.०३.२०२५ नूसार प्रकरणात पो.स्टे गेवराई यांना कळविण्यात येते की, अर्जदाराचे स्थानीक जन्माचे ठीकाणचा व रहीवासीचा तपास करून पोलीस निरीक्षक यांनी चौकशी अहवाल सादर करावा, तसेच ग्राम महसूल अधिकारी गेवराई यांनी अर्जदाराचे स्थानीक रहीवासीचा स्थानीक चौकशी/पंचनामा करून वस्तूस्थीतीदर्शक अहवाल सादर करण्याची दक्षता घेण्यात यावी.

स्वाक्षरित/–
तालूका दंडाधिकारी, गेवराई



तहसील कार्यालय, गेवराई ता. गेवराई जि.बीड
(दंड विभाग)

दुरध्वनी क्र. ०२४४७–२६२१४५
क्र.२०२५/दंड/कावि– दिनांक १३.१०.२०२५

**जन्म नोंद आदेश मिळणे बाबत**

संदर्भ :–१. शासन निर्णय क्रमांक जगगा२५२५/ईऑ९९११८१)/प्र.क्र.२२/कु.क नविन मंत्रालय मुंबई दिनांक १२.०३.२०२५

२. अर्जदार सययद शाफे इसाहाकोदिदन रा. गेवराई ता. गेवराई यांचा अर्ज दिनांक १४.०८.२०२५

उपरोक्त संदर्भीय विषयाचे अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, प्रकरणात संदर्भ क्र ०२ नूसार अर्जदार सययद शाफे इसाहाकोदिदन रा. गेवराई ता. गेवराई यांनी अर्ज देवून अर्जदार यांचा जन्म दिनांक ०३.०५.१९७४ रोजी गेवराई येथे झाला असून अर्जदार यास कायदयाचे ज्ञान नसल्यामूळे जन्म नोंद करावयाचे राहून गेल्याने प्रकरणात जन्म आदेश मिळणे बाबत या कार्यालयास संदर्भीय अर्जाव्दारे विनंती करण्यात आलेली आहे.

करीता उकत अनुषंगाने शासन निर्णय क्रमांक जम्रना२५२५/ईऑ९९११८१)/प्र.क्र/कु.क नविन मंत्रालय मुंबई दिनांक १२.०३.२०२५ नुसार प्रकरणात पो. स्टे गेवराई यांना कळविण्यात येते की, अर्जदाराचे स्थानीक जन्माचे ठीकाणचा व रहीवासीचा तपास करून पोलीस निरीक्षक यांनी चौकशी अहवाल सादर करावा, तसेच ग्राम महसूल अधिकारी गेवराई यांनी अर्जदाराचे स्थानीक रहीवासीचा स्थानीक चौकशी/पंचनामा करून वस्तूस्थीतीदर्शक अहवाल सादर करण्याची दक्षता घेण्यात यावी.

स्वाक्षरित/–
तालूका दंडाधिकारी, गेवराई

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
बुधवार दि.२५ फेब्रुवारी २०२६




माजलगाव : कृषी उत्पन्न बाजार समिती कार्यालयात संत गाडगेबाबा यांची जयंती साजरी करतांना कृषी उत्पन्न बाजार समितीचे सचिव हरिभाऊ सवणे साहेब समवेत,लेखापाल उद्धव फपाळ,संख्याकी आधिकारी मोतीराम चव्हाण,कोषपाल मीनानाथ मुळे, निरीक्षक सुनील सवणे,वरिष्ठ लिपिक अमोल आगे, प्रतवारीकार अतुल होके,नाईक शेख रहीम व सर्व कर्मचारी बांधव

# डेमो हाऊसला दाखवले उमेद स्टॉल

## कार्यकारी अभियंता सय्यद मोमीन यांचा प्रताप ;सीईओ जितिन रहेमान यांच्याकडे कारवाईची मागणी–डॉ. गणेश ढवळे

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्हा परिषदेकडून घरकुल योजनेत डेमो हाऊस बांधकामाच्या नावाखाली झालेल्या गैरव्यवहार प्रकरणात कारवाई टाळण्यासाठी डेमो हाऊसला ''उमेद स्टॉल'' म्हणून दाखवून वरिष्ठांची दिशाभूल केल्याचा प्रताप बांधकाम विभागाच्या कार्यकारी अभियंता सय्यद मोमीन यांनी केला असुन या प्रकरणात जबाबदारी निश्चित करून दोषींवर तात्काळ प्रशासकीय कारवाई करावी, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर त्यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी जितिन रहेमान यांच्याकडे



प्रत्यक्ष भेट घेऊन लेखी निवेदनाद्वारे केली आहे.

घरकुल लाभार्थ्यांना मार्गदर्शन मिळावे या उद्देशाने राज्य सरकारने प्रत्येक जिल्हा परिषद आवारात डेमो हाऊस उभारण्याचे निर्देश दिले होते. यासाठी सुमारे १ लाख ४० हजार ते जास्तीत जास्त ३ लाख रुपये खर्च अपेक्षित असताना, बीड जिल्हा परिषदेकडून ३० जानेवारी २०२४ व ५ जानेवारी २०२६ रोजी प्रत्येकी ५ लाख रुपयांचे कार्यारंभ आदेश काढून एकूण १० लाख रुपयांचा खर्च करण्यात आल्याची तक्रार डॉ. ढवळे यांनी केली आहे. केवळ २६९ चौ.फुट बांधकामासाठी १० लाख रुपयांचा खर्च दाखविण्यात आल्याने हा प्रकार घरकुल योजनेची क्रूर थट्टा असल्याचे त्यांनी म्हटले आहे. या संदर्भात दिलेल्या लेखी तक्रारीची दखल घेत अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी विलास जाधव यांनी चौकशीचे आदेश दिले होते. मात्र, जिल्हा परिषद बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता सय्यद मोमीन यांनी सादर केलेल्या अहवालात डेमो हाऊस हे घरकुल लाभार्थ्यांसाठी नसून ''उमेद स्टॉल'' असल्याचे नमूद करून मूळ उद्देश लपविण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप करण्यात आला आहे. डॉ. ढवळे यांच्या मते, संबंधित अहवालात डेमो हाऊस घरकुल योजनेअंतर्गत बांधण्यात आल्याचा स्पष्ट उल्लेख टाळण्यात आला असून, त्यामुळे मंजुरी देणाऱ्या अधिकारी–कर्मचाऱ्यांची पाठराखण होत असल्याचा संशय निर्माण झाला आहे. या प्रकरणात जबाबदार अधिकारी व कर्मचारी यांच्यावर चौकशी करून कठोर कारवाई करावी, अशी मागणी त्यांनी केली आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी जितिन रहेमान यांनी संबंधित प्रकरणात चौकशी करून दोषींवर कारवाई करण्याचे आश्वासन दिल्याची माहिती डॉ. ढवळे यांनी दिली.

# वैज्ञानिक दृष्टिकोन ठेवून इस्रोला भेट



माजलगांव। प्रतिनिधी

माध्यमिक आश्रम शाळा रामनगर ता माजलगाव जि बीड या शाळेचे विद्यार्थी चव्हाण युवराज रामेश्वर व इंगळे धनश्री दत्ता इस्त्रोच्या भेटीतून चांगले योगदान विद्यार्थ्यांचा वैज्ञानिक व सर्वांगीण विकास होण्याच्या दृष्टीने इतर बहुजन कल्याण विभाग यांच्यामार्फत निवडक विद्यार्थ्यांची निवड करून पुणे ते बेंगलोरु बेंगलोर येथे तिरुअनंतपुरम आणि तिरूअनंतपुरम ते कन्याकुमारी येथे भेट देऊन आमच्या शाळेतील विद्यार्थी चव्हाण युवराज रामेश्वर व इंगळे धनश्री दत्ता यांचा यशस्वीरित्या प्रवास झाला हे दोन विद्यार्थी आनंदमय वातावरणाने पोहोंचले तेव्हा त्यांचे स्वागत आणि अभिनंदन शाळेच्या वतीने करण्यात आले , त्यावेळी दोन्ही ही शाळेतील मुख्याध्यापक शिक्षक /शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.या दोन विद्यार्थ्यांमुळे विद्यार्थ्यांना चालना मिळत असून सर्व विद्यार्थ्यांची अभ्यासू वृत्ती वाढलेली आहे आणि याचा आनंद द्विगणित झाला आहे शाळेचे वातावरण आल्हाददायक झाले आहे.

# जि.प.तळवट बोरगावच्या विद्यार्थ्यांची वर्ल्ड रेकॉर्डमध्ये नोंद



बीड। प्रतिनिधी

बंगळूर येथील स्ट्रॅटाबिझ व्हेंचर्स अंतर्गत कार्यरत असणारी राष्ट्रविद्या गीत ही एनजीओ स्वयंसेवी संस्था आणि सायबर बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड यांच्या संयुक्त विद्यमाने भारताच्या ७६ व्या प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने आयोजित केलेल्या जागतिक स्तरावरील भारताचे राष्ट्रगीत गायन कार्यक्रमात गेवराई तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा तळवट बोरगाव शाळेतील विद्यार्थ्यांनी वैशिष्ट्यपूर्ण रीतीने सहभाग घेतल्याबद्दल शाळा, शिक्षक आणि विद्यार्थी यांची जागतिक स्तरावरील सायबर बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये नोंद घेण्यात आली आहे. बंगळुरू येथील व्यवसाय सल्लागार कंपनी स्ट्रॅटाबिझ व्हेंचर्सची सामाजिक सेवा शाखा म्हणून, राष्ट्रविद्या गीत भारतातील तरुणांसाठी अर्थपूर्ण आणि आकर्षक राष्ट्रीय स्तरावरील उपक्रम तयार करण्याचे काम करते

राष्ट्र विद्या गीत पुढील पिढीला देशभक्तीच्या भावनेने सक्षम करण्यासाठी आणि विद्यार्थी एकत्र येऊ शकतील, भारतीय म्हणून त्यांची ओळख साजरी करू शकतील आणि अर्थपूर्ण मार्गांनी राष्ट्र उभारणीत योगदान देऊ शकतील असे व्यासपीठ तयार करण्यासाठी कार्यरत आहे.

अशा या राष्ट्रविद्या गीत संस्थेने राष्ट्रीय स्तरावरील देशभक्तीपर उपक्रम भारताच्या ७६ व्या प्रजासत्ताक दिनी म्हणजे २६ जानेवारी २०२६ निमित्ताने एकाच ऑनलाइन व्यासपीठावर भारतातील सर्वाधिक विद्यार्थ्यांना एकत्रित करून सामूहिक भारतीय राष्ट्रगीत गायन हा उपक्रम आयोजित केला होता. गेवराई तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा तळवट बोरगाव शाळेतील राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त शिक्षक तथा शाळेचे मुख्याध्यापक शशिकांत कुलथे यांच्या संकल्पनेतून तसेच शाळेतील शिक्षक धर्मेंद्र गोरे आणि शिक्षिका राधिका अंबिलवादे यांच्या सहकार्यातून शाळेतील इ १ ली ते ४थी वर्गात प्रविष्ट असणाऱ्या एकूण ४९ विद्यार्थी आणि शाळेतील ३ शिक्षक अशा एकूण ५२ जणांनी व्हर्च्युअली सहभाग घेत राष्ट्रगीत गायन केले. त्यांच्या या उपक्रमाची आंतरराष्ट्रीय स्तरावरील सायबर बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये नोंद घेण्यात आलेली आहे. त्याबाबतचे प्रमाणपत्र सर्व विद्यार्थी, शिक्षक आणि शाळेला नुकतेच त्या संस्थेद्वारे प्रदान करण्यात आलेले आहे. सायबर बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये नोंद होणारी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा तळवट बोरगाव ही महाराष्ट्रातील एकमेव जिल्हा परिषदेची शाळा ठरली आहे. जिल्हा परिषद शाळा तळवट बोरगाव यांनी आयोजित केलेल्या या उपक्रमामुळे मुख्याध्यापक, शिक्षक आणि विद्यार्थी यांच्यामध्ये देशभक्ती,सांस्कृतिक जागरूकता,राष्ट्रीय एकता,सामूहिक सहभाग यांची वाढ होऊन सायबर बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड मध्ये शाळेची नोंद झाल्यामुळे शाळेचा बहुमान उंचावला आहे.

# प्रा.गौतम गायकवाड यांच्या दोन ग्रंथांचे शुक्रवारी प्रकाशन

अंबाजोगाई। प्रतिनिधी

येथील प्रख्यात साहित्यिक प्रा.गौतम गायकवाड यांच्या निखाऱ्यातील अग्निफुले व माय या दोन ग्रंथांचे प्रकाशन मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत शुक्रवार, दि. २७ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वाजता बस आगारा समोरील हॉटेल राघव या ठिकाणी होणार असून



लेखक प्रा.गौतम गायकवाड यांच्या मातोश्री स्मृतिशेष सागराबाई केरबा गायकवाड यांचा तृतीय स्मृतिदिनाचे औचित्य साधून प्रा.डॉ.धम्मपाल रेवण माशाळकर (जेष्ठ साहित्यिक,सोलापूर) डॉ.दत्तात्रय गायकवाड (जेष्ठ विचारवंत / साहित्यिक, पुणे) यांच्या हस्ते होणार आहे. अध्यक्षस्थानी ज्येष्ठ विचारवंत, साहित्यिक, भाषाप्रभू बाबा आमटे यांचे मानसपुत्र प्राचार्य डॉ.सोमनाथ रोडे हे आहेत. या कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून गुरूवर्य विष्णू सगर गुरूजी (आष्टा कासार, ता.लोहारा.), प्रा.डॉ.दिलीप सावंत (साहित्यिक, नांदेड.), डॉ.बाबासाहेब ठोंबरे (सहयोगी अधिष्ठाता तथा प्राचार्य, कृषी महाविद्यालय, लातूर.), प्रा.डॉ.म.ना.गायकवाड (साहित्यिक, धाराशिव.), प्रा.अर्जून जाधव (ज्येष्ठ विचारवंत, लातूर.), कमलाकर मोटे (मुख्याध्यापक, मुरूम.), पंडित कांबळे (साहित्यिक व कवी, धाराशिव.), तिलोत्तमा इंगोले पतकराव (आदर्श शिक्षिका, कवयित्री, अंबाजोगाई.) आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. वेदश्री प्रकाशन,लातूर यांनी हे ग्रंथ प्रकाशित केले आहेत लेखक प्रा.गौतम गायकवाड (मो.नं.९३७०९११८७४) यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

# प्रियदर्शनी प्राथमिक शाळेत राष्ट्रसंत गाडगेबाबा यांची जयंती साजरी

पाटोदा। प्रतिनिधी

पाटोदा शहरात असणाऱ्या प्रियदर्शनी प्राथमिक शाळेमध्ये सोमवार दि.२३ फेब्रुवारी २०२६ रोजी राष्ट्रसंत गाडगेबाबा यांची जयंती साजरी करण्यात आली यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक मोरे सर हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून श्रीमती गायके मॅडम या होत्या तसेच यावेळी सूत्रसंचालन श्रीमती शेलार मॅडम यांनी केले यावेळी आपल्या अध्यक्षीय भाषणातून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना मोरे सर यांनी गाडगेबाबांच्या विचारांची माहिती विद्यार्थ्यांना दिली व पालकांना आवाहन केले की मुलांच्या शिक्षणाकडे लक्ष द्या मुलांना चांगले शिक्षण द्या वेळप्रसंगी



मंदिरात दान करू नका परंतु विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी काहीही कमी पडू देऊ नका संत गाडगेबाबा सांगत की बाबांनो देव देवळात नसून तो माणसात आहे त्यामुळे माणसाने माणसाशी माणसाप्रमाणे वागावे. प्रमुख पाहुण्या म्हणून आलेल्या श्रीमती गायके मॅडम यांनी विद्यार्थ्यांना व पालकांना आवाहन केले की अंधश्रद्धा ठेवू नका. अंधश्रद्धेला बळी पडू नका गाडगे बाबा सांगत भुकेलेल्यांना –अन्न ,उघड्या नागड्यांना –वस्त्र ,बेघरांना– आसरा ,बेकारांना –रोजगार तहानलेल्या– पाणी, गोर गरिबांना –शिक्षण ,दुःखी निराधारांना –हिम्मत ,पशुपक्ष्यांना –अभय दया अशा प्रकारची शिकवण गाडगेबाबांनी दिली . आभार प्रदर्शनात श्रीमती शेलार मॅडम यांनी व्यक्त केले की संत गाडगेबाबा यांनी आपल्या कीर्तनातून जनजागृती करत त्यांनी संपूर्ण समाजाला स्वच्छतेचा संदेश दिला अशा या महान संताला आपण वंदन करूया , आपले घर,आपला परिसर, आपले गाव स्वच्छ ठेवून याची अंमलबजावणी करूया एवढे बोलून सर्वांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली

# पाटोदा तालुक्यातील ३ हजार शेतकरी रब्बी व अतिवृष्टी अनुदानापासून वंचित; प्रशासकीय उदासीनतेविरोधात संताप!

पाटोदा । प्रतिनिधी

राज्यात एकीकडे हिवाळी अधिवेशनाचे सूप वाजत असताना, दुसरीकडे पाटोदा तालुक्यातील शेतकरी मात्र हक्काच्या अनुदानासाठी सरकारी उंबरठे झिजवत आहेत. रब्बी आणि अतिवृष्टी योजनेचे अनुदान अद्यापही न मिळाल्याने तब्बल ३ हजार शेतकऱ्यांमध्ये तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. विशेष म्हणजे, तलाठी आणि तहसील कार्यालयाकडून समाधानकारक उत्तरे मिळत नसल्याने प्रशासकीय यंत्रणा शेतकऱ्यांच्या प्रश्नांबाबत 'ढिम्म' असल्याचे चित्र समोर आले आहे.

पाटोदा तालुक्यातील अनेक शेतकऱ्यांनी तहसील कार्यालयातील विभाग आणि स्थानिक तलाठ्यांकडे वारंवार चौकशी केली. मात्र, ''वरकडून निधी आला नाही'' किंवा ''अजून काम सुरू आहे'' अशी उडवाउडवीची उत्तरे देऊन शेतकऱ्यांना रिकाम्या हाती परत पाठवले जात आहे. हक्काचे तीन हजार कोटींचे अनुदान रखडल्याने शेतकऱ्यांसमोर आर्थिक संकट उभे राहिले आहे. या संपूर्ण संघर्षात मराठवाड्यातील शेतकऱ्यांचे प्रश्न मांडण्यासाठी केवळ आमदार सुरेश धस हेच आक्रमकपणे मैदानात उतरताना दिसत आहेत. ''बाकीचे लोकप्रतिनिधी कुठे आहेत?'' असा सवाल आता सामान्य शेतकरी विचारू लागला आहे. शेती, रोजगार, शिक्षण आणि आरोग्य यांसारख्या मूलभूत प्रश्नांवर बोलण्याऐवजी सरकार केवळ जाती-जातींमध्ये भांडणे लावून स्वतःची राजकीय पोळी भाजून घेण्यात व्यस्त असल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे. शेतकऱ्यांच्या मते, चालू असलेले अधिवेशन हे केवळ मंत्र्यांचे आणि सत्ताधाऱ्यांचे खिसे भरण्यासाठी आहे. रोजगाराच्या संधी किंवा आरोग्य सोयींवर चर्चा करण्याऐवजी समाजात तेढ निर्माण करून बातम्या बनवण्याचे काम सुरू आहे. ''सरकार हे शेतकरी हिताचे नसून केवळ घोषणाबाजी करणारे आहे,'' अशी भावना संतप्त शेतकऱ्यांनी बोलून दाखवली. जर येत्या काही दिवसांत रब्बी आणि सृष्टी अनुदानाचा प्रश्न सुटला नाही, तर पाटोदा तालुक्यातील शेतकरी मोठ्या जनआंदोलनाच्या तयारीत आहेत. 'आता फक्त चौकशी नाही, तर खात्यात जमा झालेले अनुदानच हवं,' असा पवित्रा ३ हजार पीडित शेतकऱ्यांनी घेतला आहे.

# पंचशील आणि २२ प्रतिज्ञांचे आचरण हाच खरा धम्मप्रचार

## माजलगाव येथे जिल्हास्तरीय धम्मप्रचारक गौरव सोहळा उत्साहात पार

माजलगाव । प्रतिनिधी

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेला सद्धम्माचा विचार घराघरात पोहोचवणाऱ्या धम्मयोद्ध्यांचा सन्मान करण्यासाठी माजलगाव येथे आयोजित करण्यात आलेला जिल्हास्तरीय गौरव सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. ''बुद्धांचा मार्ग हा मानवी कल्याणाचा मार्ग आहे, त्यामुळे केवळ नावापुरते बौद्ध न राहता जातीचे बंधन तोडून पंचशील आणि २२ प्रतिज्ञांचे आचरण करणे हीच काळाची गरज आहे,'' असा सूर या सोहळ्यात उमटला. कार्यक्रमाची सुरुवात आणि मानवंदना जनकल्याण बहुउद्देशीय सेवाभावी संस्था व सातकर्णी युवक संघ यांच्या संयुक्त विद्यमाने श्रावस्ती बौद्ध विहार, केसापुरी कॅम्प येथे या सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाची सुरुवात भगवान बुद्ध आणि महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमा पूजनाने झाली. यावेळी समता सैनिक दलाच्या वतीने उपस्थित मान्यवरांना शिस्तबद्ध मानवंदना देण्यात आली, ज्यामुळे वातावरणात चैतन्य निर्माण झाले होते.

कार्यक्रमाचे उद्घाटन सामाजिक न्याय विभागाचे सहाय्यक आयुक्त प्रदीप भोगले यांच्या हस्ते झाले. यावेळी मार्गदर्शन करताना ते म्हणाले की, ''आपल्या कृती आणि



करणीमध्ये अंतर असू नये. बाबासाहेबांनी दिलेल्या २२ प्रतिज्ञा केवळ वाचण्यासाठी नसून त्या जगण्यासाठी आहेत. अष्टांगिक मार्गाचा अवलंब करूनच आपण समाजाला नवी दिशा देऊ शकतो.'' मुख्य वक्ते प्रा. श्रीकिशन मोरे यांनी आपल्या अमोघ वाणीने उपस्थितांना अंतर्मुख केले. ते म्हणाले, ''बाबासाहेबांनी आपल्याला सर्व काही दिले, पण आपण समाजाला काय दिले याचा विचार करण्याची वेळ आली आहे. पाली ही आपली सांस्कृतिक भाषा असली तरी ती बोलीभाषा नाही, त्यामुळे बौद्धाचार्यांनी धम्माचा अर्थ मराठीतून समजावून सांगावा जेणेकरून तो सर्वसामान्यांना समजेल.'' त्यांनी पुढे पोटजातींचा त्याग करून केवळ 'बौद्ध' म्हणून एकत्र येण्याचे आणि इतर जातींतून धम्मात आलेल्या बांधवांना प्रेमाने सामावून घेण्याचे आवाहन केले. अध्यक्षीय समारोप करताना विद्वत सभेचे अध्यक्ष भास्करराव भोजने म्हणाले की, ''बाबासाहेबांनी जातीचा अंत करण्यासाठी धम्मचक्र प्रवर्तन केले. आपण त्यावर ठाम राहिले पाहिजे. आपले संवैधानिक अधिकार अबाधित राखणारा नेता निवडण्याची प्रगल्भता समाजात निर्माण व्हायला हवी.'' भैय्यासाहेब आंबेडकर आणि त्यानंतर प्रकाश आंबेडकर यांनी बौद्धांना केंद्रीय कोट्यातून देखील सवलतीचे लाभ मिळावे यासाठी अथक परिश्रम घेतले आहेत आता पुन्हा मोठा लढा उभारण्याची गरज असल्याचे आवाहन देखील भोजने यांनी केलं.

या सोहळ्यात धम्म चळवळीच्या बळकटीकरणासाठी काही महत्त्वपूर्ण ठराव मंजूर करण्यात आले. अभिजात पाली भाषा सर्व महाविद्यालयांत शिकवण्यात यावी. प्रत्येक तालुक्यात पाली भाषा शिकवणी केंद्र सुरू करावे. बौद्ध संस्कारांची अंमलबजावणी काटेकोरपणे व्हावी. विधी वेळेवर पार पाडले जावेत. सर्वात महत्त्वाचे: महापुरुषांची जयंती 'डीजे' मुक्त करून वैचारिक पद्धतीने साजरी करावी. यावेळी बीड जिल्ह्यातील ११ ही तालुक्यांतील सक्रिय धम्मप्रचारक, बौद्धाचार्य आणि समता सैनिक दलाच्या पदाधिकाऱ्यांचा सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्र देऊन गौरव करण्यात आला. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी भारत तांगडे, ॲड. रविकांत उघडे, बाबासाहेब जाधव, अशोक कांबळे, सुभाष बोराडे, लक्ष्मण जाधव, विशाल उघडे, विकास डोंगरदिवे, सुमेध जाधव, बिभीषण उघडे आदींनी परिश्रम घेतले. कार्यक्रमास जिल्ह्यातील बौद्ध बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# लिंबागणेश प्राथमिक आरोग्य केंद्रात नेत्र तपासणी शिबिर



लिंबागणेश। प्रतिनिधी

बीड तालुक्यातील लिंबागणेश येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात आज दि.२४ वार मंगळवार रोजी मोफत नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरास ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. सूर्या नेत्रालय येथील नेत्रतज्ज्ञ डॉ. अंजली गायकवाड यांच्या सहकार्याने हे शिबिर यशस्वीरीत्या पार पडले. या शिबिराचे उद्घाटन डॉ. गणेश ढवळे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी सरपंच बालासाहेब जाधव, पत्रकार हरिओम क्षीरसागर यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

शिबिरामध्ये मोठ्या संख्येने ग्रामस्थांनी आपली नेत्र तपासणी करून घेतली. गरजू रुग्णांना अल्प दरात चष्म्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली. तसेच डोळ्यांच्या विविध समस्यांचे निदान करून रुग्णांना योग्य उपचार व मार्गदर्शन करण्यात आले. या उपक्रमामुळे ग्रामस्थांना मोठा दिलासा मिळाला. शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वैद्यकीय अधिकारी डॉ. रुपाली चिटकुलवार, डॉ. ऋषिकेश आंधळे, डॉ. प्रमोद गोरे (सीएचओ, बोरखेड), आरोग्य निरीक्षक अशोक लोखंडे, आरोग्य सेवक वीर सापते, प्रयोगशाळा तज्ञ ऋषिकेश शेळके, औषध निर्माता जे. एस. कंचार, परिचारिका सोनाली शिंदे, व्ही. बी. भांडवलकर, एल. एच. कर्मचारी सुरेश अवसरे तसेच सेविका ज्योत्स्ना शिंदे यांनी विशेष सहकार्य केले. या नेत्र तपासणी शिबिरामुळे ग्रामस्थांमध्ये डोळ्यांच्या आरोग्याबाबत जागरूकता निर्माण झाली असून, भविष्यातही अशा आरोग्यविषयक उपक्रमांचे आयोजन करण्यात यावे, अशी अपेक्षा ग्रामस्थांनी व्यक्त केली.

राज्य लोकतंत्र
शेत-शिवार
बुधवार दि. २५ फेब्रुवारी २०२६
४

# अवकाळी पाऊस, गारपिटीने केज, परळी अंबाजोगाई तालुक्यातील पिकांचे नुकसान...!






## तहसीलदारांनी दिले पंचनामा करण्याचे आदेश

केज : सोमवारपासून वातावरणात अचानक झालेल्या बदलानंतर केज तालुक्यातील बनकरंजा, परळी, अंबाजोगाई, पाटोदा, माजलगाव तालुक्यात बऱ्याच गावांमध्ये अवकाळी पावसासह गारपीट झाल्याने उभ्या शेती पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. बनकरंजा येथील मका, गहू, राजमा, कांदा, ज्वारी, हरभरा इत्यादीसह भाजीपाल्याचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. नुकसानीचे तातडीने पंचनामे करून शेतकऱ्यांना तात्काळ नुकसान भरपाई देण्यात यावी यासाठी केज तहसीलदार यांना निवेदन देण्यात आले आहे.

केज तालुक्यातील बनकरंजा येथे व परिसरातील शेतकऱ्यांच्या पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. मका, गहू, राजमा, कांदा अशा अनेक पिकांचे झालेल्या गारपिटीने पूर्ण नुकसान झाले आहे. आधीच आर्थिक अडचणीत असलेला शेतकरी पुन्हा एकदा निसर्गाच्या अवकृपेने अडचणीत सापडला आहे. वाऱ्यासह पावसापासून मोठे नुकसान झाले आहे. या संदर्भात तलाठी, कृषी सहाय्यक, तहसीलदार यांना निवेदन देऊन झालेल्या पिकांची पाहणी करून पंचनामा करून शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळवून देण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. यावेळी सामाजिक कार्यकर्ते धनराज लाटे, प्रमोद शेप, दुर्गादास लांब यांच्यासह इतर गावकरी उपस्थित होते. अनेक गावांना फटका : अंबाजोगाई,केज,पाटोदा, माजलगाव तालुक्यातील बऱ्याच गावांमध्ये वादळी वाऱ्यासह अवकाळी पाऊस तसेच बऱ्याच गावांमध्ये गारपीट झाली आहे. यात गहू, ज्वारी, हरभरा, मका, भाजीपाला, फळपिके यांसह विविध पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. त्यामुळे संबंधित नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना राज्य शासनाकडून आर्थिक मदत मिळावी, यासाठी तत्काळ पंचनामे करून नुकसानीचे अहवाल शासनास पाठवण्याचा सूचना जिल्हा प्रशासनाला केल्या आहेत.

# आता जनावरांचा स्तनदाह घरीच तपासणे शक्य!

स्तनदाह हा पशुपालनातील सर्वाधिक आर्थिक हानी करणारा आजार आहे. स्तनदाह या आजाराला ग्रामीण भाषेत 'दगडी' आणि इंग्रजीमध्ये 'मस्टायटीस' या नावाने ओळखले जाते. दुभत्या जनावरांना होणाऱ्या या आजारामुळे पशुपालकांना खूप नुकसान सहन करावे लागते. परंतु इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी कानपूर यांनी आधुनिक संशोधन केलेले एक नवीन किट विकसित केली आहे. 'लॅटरल फ्लो इम्युनोसे स्ट्रिप अँड मेथड फॉर डिटेक्शन ऑफ मॅस्टिटिस इन बोवाइन्स' या नावाच्या संशोधित किट द्वारे आता अवघ्या काही मिनिटात स्तनदाहचे निदान करता येणे शक्य होणार आहे.



या किटचे संशोधन रसायन अभियांत्रिकी विभाग, कानपूर आणि राष्ट्रीय केंद्राचे प्रा. सिद्धार्थ पांडा आणि डॉ. सत्येंद्र कुमार, वरिष्ठ प्रकल्प शास्त्रज्ञ, कानपूर यांनी केले आहे. या तंत्रज्ञानाला भारतीय पेटंट कार्यालयाने भारतीय पेटंट क्रमांक ४५५२३२ ने मंजूर दिली असून पॉलीक्लोनल अँटीबॉडी आणि स्ट्रिप चाचणीच्या रूपात नवीन डिझाइन वापरून ही किट तयार करण्यात आली आहे. दुभत्या जनावरांमध्ये स्तनदाह शोधण्यात क्रांती घडवून आणण्याचे या अभिनव तंत्रज्ञानाचे उद्दिष्ट आहे. त्याचा व्यापक वापर सुलभ करण्यासाठी डेअरी उत्पादक कंपनीसोबत तंत्रज्ञान हस्तांतरण सामंजस्य करार देखील पूर्ण केला गेला आहे. स्तनदाह (मस्टायटीस) हे डेअरी उद्योगांमध्ये आर्थिक नुकसानीचे एक प्रमुख कारण मानले जाते, ज्यामुळे दुधाचे उत्पादन कमी होते. तसेच दुधाची गुणवत्ता देखील खराब होते. या रोगामध्ये स्तन ग्रंथी व कासेच्या ऊतीमध्ये एक दाहक क्रिया घडते जी शारीरिक आघात किंवा सूक्ष्मजीव संसर्गामुळे होते. ज्यामुळे पशुपालकाची मोठी आर्थिक होत असते. अशावेळी ही संशोधित किट वापरून अवघ्या काही वेळात स्तनदाहचे निदान करणे सोपे होणार आहे.

किटद्वारे अशी होते तपासणी : या किटमध्ये दुधाचे काही थेंब टाकल्यावर अवघ्या काही क्षणात मस्टायटीसचे निदान होते. हाताळणीस सोप्या असलेल्या या किटद्वारे पशुपालक देखील सहजरित्या मस्टायटीसचे निदान करू शकतात.

# आंबा फळगळतीची कारणे

आंबा फळगळती ही प्रामुख्याने नैसर्गिक प्रक्रिया असली, तरी ती ८०-९० टक्क्यांपर्यंत झाल्यास उत्पादनात मोठी घट होते. फळगळतीची नेमकी कारणे काय आहेत, हे समजून घेतल्यास यावर उपाययोजना करने सोपे जाते.

आंबा फळगळतीची कारणे : फळधारणा झाल्यानंतर सुरुवातीस केवळ पेशी विभाजन होते. ते तीन आठवडयांत पूर्ण होऊन पेशींची अपेक्षित संख्या तयार झाल्यावर फळाचा आकार वाढीस लागतो. काही दिवसांनी त्यात बी वाढण्यास सुरुवात होते. या वेगवेगळ्या अवस्थेत फळ व फांदीमध्ये कमी-जास्त प्रमाणात ऑक्झिनची निर्मिती होते. ऑक्झिन्स फांदीच्या तुलनेत फळात जास्त असतील तर फळगळ होत नाही. फळात ऑक्झिन कमी पडल्यास त्याच्या देठाजवळ एक चीर (ॲब्सिशन लेअर) पडते. त्यामुळे फळगळ होते. फळावर पडणारा सूर्यप्रकाश, तापमानवाढ, फळांवर रोग-किडींचा प्रादुर्भाव अशा कोणत्याही कारणामुळे फळातील ऑक्झिनचा नाश होतो.

आंब्याची जात : ज्या जातीमध्ये देठ मजबूत असतो, त्यांत फळगळ कमी होते. देठ कमकुवत असणाऱ्या जातींमध्ये फळगळतीचे प्रमाण जास्त असते.

प्रतिकूल वातावरण : कमाल आणि किमान तापमानातील तफावत, आर्द्रतेमधील चढ-उतार यांमुळे फळांची गळ जास्त होते. ढगाळ वातावरण, बेमोसमी पाऊस, धुके यांमुळे कीड-रोगांचा प्रादुर्भाव वाढूनदेखील फळगळ वाढते. फळे लहान असताना फेब्रुवारी-मार्च महिन्यात तापमान अचानक ३५ अंश सेल्सिसवर गेल्यास लहान फळांमधील ऑक्झिन नाश पावते, फळगळ वाढते. कीड-रोग प्रादुर्भाव : फुलधारणा, फळधारणेच्या अवस्थेत तुडतुडे, फुलकिडे, अन्य रसशोषक किडींचा प्रादुर्भाव झाल्यास फळगळ होण्याची शक्यता असते. भुरीचे पांढरे आवरण तयार होऊन मोहोर आणि अविकसित फळे गळून पडतात. करपा रोगामुळे मोहोर आणि फळांचा देठ काळा पडून सुकतो. करप्यामुळे लहान फळांची मोठ्या प्रमाणावर गळ होते. अन्नद्रव्य कमतरता : योग्य अवस्थेला व मात्रेत शिफारशीनुसार अन्नद्रव्य व्यवस्थापन केले नाही, तर पोषण अपुरे पडून फळगळ वाढते.



# पामची शेती करा आणि मिळवा भरघोस नफा

अनेक शेतकऱ्यांना खताच्या वापराबाबत योग्य माहिती नसल्याने अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. कारण पिकांमध्ये कमी-अधिक प्रमाणात खत टाकल्यास पिकांचे नुकसान होते आणि त्यामुळे शेतकऱ्यांचे नुकसान होते. अशा परिस्थितीत तुम्हाला डीएपी, एनपीके आणि युरिया या पिकांमध्ये खतांचा वापर कसा करावा याबद्दल माहिती देणार आहोत.



डीएपी, एनपीके, कडुनिंब आणि युरिया खतांचा वापर : १) डाय-अमोनियम फॉस्फेट खत (डीएपी) : २०२०-२१ मध्ये ११९.१९ लाख टन विक्रीसह डीएपी हे भारतातील दुसरे सर्वाधिक वापरले जाणारे खत आहे. ही खते पेरणीपूर्वी किंवा पेरणीच्या वेळी लावली जातात, कारण त्यात फॉस्फरसचे प्रमाण जास्त असते, ज्यामुळे मुळांची स्थापना आणि विकास निश्चित होतो. जर तुम्ही त्याचा वापर केला नाही तर, झाडे त्यांच्या सामान्य आकारात वाढू शकणार नाहीत कारण नैसर्गिकरित्या बराच वेळ लागतो. डीएपी मध्ये ४६% फॉस्फरस आणि १८% नायट्रोजन असते. अलीकडेच सरकारने डीएपीवरील अनुदानात १३७ टक्के वाढ जाहीर केली आहे. डीएपीवर दिलेली सबसिडी ही पोषक तत्वांवर आधारित सबसिडी आहे ज्याचे दर पोषक तत्वांमध्ये बदलतात.

डीएपी कसे वापरावे : आपण प्रति हेक्टर डीएपी प्रति हेक्टर वनस्पतींच्या संख्येइतके वापरू शकता. उदाहरणार्थ १ हेक्टरसाठी १०० किलो डीएपी वापरता येते.

एनपीके : अनेक शास्त्रज्ञांचा असा दावा आहे की एनपीके खत हे डीएपी पेक्षा चांगले आहे कारण ते जमिनीत आम्लता आणत नाही. पिकांच्या संतुलित वाढीसाठी सहा मॅक्रो पोषक द्रव्ये आवश्यक आहेत ज्यात नायट्रोजन (एन), फॉस्फरस (पी), पोटॅशियम (के), कॅल्शियम (ए), मॅग्नेशियम (एमजी), सल्फर (एस). त्याचवेळी, नायट्रोजन खतांमध्ये अमोनियम नायट्रेट आणि अमोनियम सल्फेट यांचा समावेश होतो. पोटॅसिक खतांमध्ये पोटॅशियम नायट्रेट आणि चिली सल्फेट यांचा समावेश होतो. फॉस्फेटिक खतांमध्ये सुपर फॉस्फेट, ट्रिपल फॉस्फेट यांचा समावेश होतो. ४:२:१ चे एनपीके गुणोत्तर जमिनीचे आरोग्य सुधारते आणि पीक उत्पादन वाढवते. त्यामुळे शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढते.

एनपीके कसे वापरावे : १ टन धान्य तयार करण्यासाठी झाडांना प्रति हेक्टर १५ ते २० किलो नायट्रोजन (एनपीके प्रति हेक्टर वापर) घेणे आवश्यक आहे. याचा अर्थ एक टन धान्य तयार करण्यासाठी, दुप्पट खत किंवा ३०-४० किलो नत्र प्रति हेक्टर आवश्यक आहे.

युरिया खत : युरिया खताचे मुख्य कार्य म्हणजे पिकांच्या वाढीस चालना देण्यासोबत नायट्रोजन देणे. त्यामुळे झाडे ताजीतवानी होऊन लवकर वाढण्यास मदत होते. युरियाचा वापर कृषी क्षेत्रात खत म्हणून मोठ्या प्रमाणात केला जातो. नायट्रोजनचे प्रमाण आणि कमी उत्पादन खर्च ही युरिया खताची वैशिष्ट्ये आहेत. सर्व प्रकारच्या पिके आणि मातीसाठी युरिया हे सर्वोत्तम खतांपैकी एक आहे.

युरिया खत कसे वापरावे : जर तुम्हाला तुमच्या शेतानुसार युरियाचा वापर करायचा असेल तर तुम्ही हे अवलंबू शकता. त्याच वेळी, एका अंदाजानुसार, २०० पौंड युरिया प्रति एकर वापरला जातो.

निम लेपित खत : नीम कोटेड युरिया: नायट्रिफिकेशन गुणधर्मासाठी नीम तेलाने युरियाची फवारणी केली जाते. युरियापासून नायट्रोजन काढण्याची प्रक्रिया कडुलिंबाच्या पेस्टद्वारे शोधली जाते आणि नायट्रोजनच्या वापराची कार्यक्षमता वाढते. नीम कोट युरिया धान, ऊस, मका, सोयाबीन, तूर/लाल हरभरा यांचे उत्पादन वाढवते. युरियामध्ये उच्च एन आणि पी सामग्री ४६% आणि ६०% असते ज्यामुळे जमिनीचे आरोग्य आणि पीक वाढ सुधारण्यास मदत होते.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१५१० : पोर्तुगीज सरदार अल्बुकर्क याने अकस्मात हल्ला करुन पणजीचा किल्ला जिंकला.
१५६८ – सम्राट अकबर बादशहाने रजपुतांचा प्रचंड पराभव करुन चित्तोडगड आपल्या ताब्यात घेतला.
१८१८ : ले. कर्नल डिफनने चाकणचा किल्ला उध्वस्त केला. दख्खन ताब्यात आल्यावर इंग्रजांनी सह्याद्रीतील बहुतेक सर्व किल्ल्यांची मोडतोड केली.
१८६३ : आजच्या दिवशी अमेरिकेचे १६ वे राष्ट्राध्यक्ष अब्राहमन लिंकन यांनी अमेरिकेतील चलन कायद्यावर सही केली.
१९३५ : 'फॉक्स मॉथ' विमानाद्वारे मुंबई नागपूर जमशेदपूर या मार्गावरील हवाई टपाल सेवेला प्रारंभ झाला.
१९४५ : दुसरे महायुद्ध तुर्कस्तानने जर्मनीविरुद्ध युद्ध पुकारले.
१९४५ : दुसरे महायुद्ध अमेरिकन विमानवाहू नौकांनी टोकियोवर बॉम्बहल्ला केला.
१९५२ : नार्वे ची राजधानी ओस्लो मध्ये आजच्या दिवशी हिवाळी ऑलिम्पिक समारोह पार पडला.
१९६२ : काँग्रेस सार्वत्रिक निवडणूक जिंकली.
१९६८ : मोहम्मद हिदायतुल्लाह यांनी भारताचे ११ वे सरन्यायाधीश म्हणुन कार्यभार सांभाळला.
१९८६ : जनआंदोलनाच्या रेट्यामुळे २० वर्षे राज्य केल्यानंतर फिलिपाइन्सचे राष्ट्राध्यक्ष फर्डिनांड मार्कोस यांनी सत्ता सोडुन देशातुन पलायन केले.
१९८८ – संपुर्ण भारतीय बनावटीच्या पृथ्वी या क्षेपणास्त्राची श्रीहरिकोट्टा या केंद्रावर यशस्वी चाचणी
१९९६ : 'स्वर्गदारा'तील तार्याला वि. वा. शिरवाडकर ऊर्फ कविवर्य कुसुमाग्रज यांचे नाव देण्यात आले. स्वित्झर्लंडमधील 'इंटरनॅशनल स्टार रजिस्ट्री' या आंतरराष्ट्रीय संस्थेने हा गौरव केला. मिथुन तारकासमुहातील कॅस्टर (पुनर्वसू) व पोलक्स जवळच्या तार्याचे 'कुसुमाग्रज तारा' असे नामकरण केले.
२००८ : 'नो कंट्री फ़ॉर ओल्ड मॅन'' या चित्रपटाला ८० व्या ऑस्कर अकादमी पुरस्कारासाठी निवडल्या गेले.
२००९ : आजच्या दिवशी माजी सैन्य अधिकारी धीरज मल्होत्रा यांना इंडियन प्रीमियर लीग चे
२०१३ : रशियन सरकार ने रस्त्यांवर आणि शाळेच्या जवळपास धूम्रपान न करण्याचा नवीन कायदा बनवला.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८४० : विनायक कोंडदेव ओक बालवाङ्मयकार. मुलांसाठी 'बालबोध' हे मासिक काढून त्यांनी चरित्रे, कविता, निबंध, शास्त्रीय विषयांवरील लेख इ. लेखन केले व मराठी बालवाङ्मयाचा पाया घातला. त्यांची सुमारे पन्नास पुस्तके प्रसिद्ध झाली. सहज व सोपी भाषा हे त्यांचे वैशिष्ट्य होते. (मृत्यू:९ आक्टोबर १९१४)
१८९४ : अवतार मेहेरबाबा आध्यात्मिक गुरू, मौनव्रती संत, त्यांनी सलग ४४ वर्षे मौनव्रत पाळले होते. (मृत्यू: ३१ जानेवारी
१९६९ मेहराझाद, पिंपळगाव, अहमदनगर, महाराष्ट्र)
१८९९ : पंजाब चे माजी मुख्यमंत्री गुरनाम सिंह यांचा जन्म.
१९३८ : भारतीय क्रिकेट खेळाडू आणि पंच फारूक इंजिनिअर यांचा जन्म.
१९४० : बालवाङ्मयकार विनायक कोंडदेव ओक यांचा जन्म. (मृत्यू: ९ ऑक्टोबर १९१४)
१९४३ : जॉर्ज हॅरिसन 'बीटल्स'चा गिटारवादक, संगीतकार, गायक आणि गीतलेखक (मृत्यू: २९ नोव्हेंबर २००१)
१९४८ : डॅनी डेंग्झोप्पा चित्रपट अभिनेते
१९७४ : दिव्या भारती हिन्दी, तामिळ आणि तेलगु चित्रपट अभिनेत्री (मृत्यू: ५ एप्रिल १९९३)
१९८१ : भारतीय अभिनेता अनुज साहनी यांचा जन्म.
१९८१ : भारतीय अभिनेता शहीद कपूर यांचा जन्म.
१९९२ : हिंदी चित्रपट अभिनेत्री सान्या मल्होत्रा यांचा जन्म.
१९९४ : हिंदी चित्रपट अभिनेत्री उर्वशी रौतेला यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१५९९ : संत एकनाथ (जन्म: ? ? १५३३) भगवंत भक्त संत एकनाथानी पैठण येथे आजच्या दिवशी समाधी
१८८६ – गुजराथी कवी नर्मदाशंकर दवे यांचे निधन हुतात्मा किसन आहिर व नानकसिंग पुण्यतिथी
१९२४ : जमखिंडीचे संस्थानिक सर परशुरामभाऊ पटवर्धन यांना त्यांच्याच मस्तवाल हत्तीने चिरडून ठार केले. त्यांच्या स्मरणार्थ दिलेल्या देणगीनंतर पुण्यातील न्यू पूना कॉलेजचे नाव 'एस. पी. कॉलेज' असे करण्यात आले. (जन्म:)
१९६४ : शांता आपटे चित्रपट अभिनेत्री (कुंकू, दुनिया ना माने, अमृत मंथन इ.) (जन्म:१९१६)
१९७८ : डॉ. प. ल. वैद्य प्राच्यविद्यासंशोधक (जन्म: २९ जून १८९१)
१९८० : गिरजाबाई महादेव केळकर लेखिका व नाटककार (जन्म:)
१९९९ : ग्लेन सीबोर्ग नोबेल पारितोषिक विजेते अमेरिकन रसायनशास्त्रज्ञ (जन्म: १९ एप्रिल १९१२)
२००१ : सर डोनाल्ड ब्रॅडमन ऑस्ट्रेलियन फलंदाज, संघनायक व विक्रमवीर. १९४९ मध्ये त्यांना 'सर' हा किताब देण्यात आला. (जन्म: २७ ऑगस्ट १९०८)
२००७ : मल्याळम कवी पी भास्करन यांचे निधन.
२०१६ : भारतीय उद्योगपती आणि समाजसेवक भवरलाल जैन यांचे निधन. (जन्म: १२ डिसेंबर १९३७)

बुधवार दि. २५ फेब्रुवारी २०२६ ५

राज्य लोकतंत्र मराठवाडा वृत्तांत





# अवकाळीचा ज्वारी, कांद्यासह रब्बीच्या पिकांना तडाखा

## तुळजापुरात नुकसान, काढणीस आलेल्या अन् काढून टाकलेल्या पिकांवर परिणाम, खरिपानंतर रब्बी पिकांवरही आले संकट

धाराशिव। प्रतिनिधी

तुळजापूर तालुक्यासह काक्रंबा परिसरात सोमवारी (दि. २३) पहाटे पावणे सहा वाजेपासून जवळपास अर्धा तास अवकाळी पावसाने चांगले झोडपून काढल्याने रब्बी हंगामातील काढणीस आलेल्या व शेतात काढून टाकलेल्या शेती पिकासह कांदा फळबागांना जबर फटका बसला आहे. त्यामुळे भल्या पहाटेच शेतकऱ्यांची अवकाळीने झोप उडवली असून, अवकाळी पावसाने नुकसान झालेल्या रब्बी हंगामातील पिके व फळबागांचे पंचनामे प्रशासनाने तातडीने करण्याची मागणी नुकसानग्रस्त शेतकऱ्यांमधून होत आहे.

तुळजापूर तालुक्यात गेल्या दोन-तीन दिवसांपासून वातावरणात बदल झाला आहे. ढगाळ वातावरण निर्माण झाल्याने विशेषतः द्राक्ष बागायतदार शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले होते. तर दुसरीकडे हवामान खात्यानेही तीन दिवस अवकाळी पावसाचा अंदाज व्यक्त केला आहे. सोमवारी पहाटे पावणे सहापासून तुळजापूर तालुक्यातील काक्रंबा, अपसिंगा, कामठा, कात्री, मोर्डा, तडवळा, बारूळहोनाळा, वडगावलाख, खंडाळा, काक्रंबावाडी, हंगरगा तुळ, कार्ला, वानेगाव, जवळगा मे, वडगाव देव, सलगरा, किलज, मंगरूळ, सिंदफळ, ढेकरी, शिराढोण, कुंभारी आदी गावांसह तालुक्यातील अनेक गावांना जवळपास अर्धा तास अवकाळी पावसाने चांगले झोडपून काढले आहे. सध्या रब्बी हंगामातील गहू, ज्वारी, हरभरा, कांदा ही पिके काढणीस आली आहेत. अनेक शेतकऱ्यांनी पिकांची काढणी सुरू केली असून, शेतात गहू, ज्वारी, हरभरा, कांदा पिके काढून टाकली आहेत, अशातच सोमवारी पहाटे अवकाळी पावसाने जोरदार हजेरी लावल्याने रब्बीतील काढणीला आलेल्या व काढून टाकलेल्या पिकांना या अवकाळी पावसाचा जबर तडाखा बसला आहे. शेतकऱ्यांनी लाखो रुपये खर्च करून जोपासलेल्या व हातातोंडाशी आलेल्या द्राक्ष



बागेला अवकाळी पावसाचा फटका बसला आहे. प्रतिनिधी । तुळजापूर तुळजापूर शहर आणि परिसरात सोमवार (दि. २३) पहाटे जोरदार अवकाळी पावसाने हजेरी लावली. सुमारे अर्धा तास झालेल्या जोरदार पावसाने काढणीला आलेले गहु, ज्वारी, हरभरा आदी रब्बी पिकासह कांदा, आंबा, द्राक्ष बागांचे नुकसान झाले आहे. शहर आणि रविवार दिवसभर ढगाळ वातावरण निर्माण झाले होते. यामुळे कडाक्याचा उन्हापासून दिलासा मिळाला असला तरी सोमवारी पहाटे जोरदार पावसाने हजेरी लावल्याने काढणीला आलेले गहु, ज्वारी, हरभरा आदि रब्बी पिकासह कांदा, आंबा, द्राक्ष बागांचे नुकसान झाले असुन शेतकऱ्यांचा हाता तोडांशी आलेला घास हिरावला आहे.प्रतिनिधी । धाराशिव मागील आठवडाभरात सकाळी गारठा दुपारी उन्हाचे चटके बसत होते. कमाल तापमान ३५ अंशापर्यंत गेले होते. मात्र, मागील सोमवारी पहाटे हलक्या सरी कोळसल्या. सायंकाळी मेघगर्जनेसह हलका पाऊस झाला.ढगाळ वातावरण व पावसाचा द्राक्ष बागा, आंबा पिकांना फटका बसण्याची शक्यता आहे. फेब्रुवारी महिना उजाडताच किमान तापमानात चढ-उतार जाणवू लागत होता. पहिल्या आठवड्यात गारठ्याचे प्रमाण अधिक होते. त्यानंतर कमाल तापमानात हळूहळू वाढ होत असल्याने सकाळी गारठा असला तरी दुपारी उन्हाचे चटके बसत होते. किमान तापमान १६ अंशांवरून १९ अंशाच्या पुढे सरकले होते. कमाल तापमानही ३४ ते ३५ अंशांवर राहत आहे. दोन दिवस ढगाळ व हलक्या पावसाची शक्यता हवामान विभागाने वर्तविली होती. सोमवारी पहाटे हलक्या सरी झाल्या. त्यानंतर सायंकाळी ढगाळ वातावरण होते. ६.३० वाजल्यानंतर वादळी वारा, मेघगर्जनेसह हलक्या सरी कोसळत होत्या. अचानक झालेल्या पावसामुळे काढलेला हरभरा सुरक्षित ठिकाणी झाकून ठेवण्यासाठी शेतकऱ्यांची चांगलीच धावपळ उडाली. येत्या काही दिवसात पावसाने तडका दिल्यास फटका बसण्याची शक्यता आहे. खरिपानंतर आताही नुकसान गतवर्षी तब्बल पंधरा दिवस अगोदर पावसाने जोरदार हजेरी लावली होती. खरिपातील तूर, उडीद, मूग, सोयाबीन, बाजरी ही पिके काढणीला येताच ऑक्टोबर-नोव्हेंबरमध चे तालुक्यात मोठ्या प्रमाणात अतिवृष्टी झाली. त्यामुळे पिकाबरोबर शेतातील माती वाहून गेल्याने शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले. आता रब्बी हंगामातील गहू, ज्वारी, हरभरा, कांदा पिकांची काढणी सुरू असून, पिके काढून टाकली आहेत.

# नगर तालुक्यात दरोड्याच्या तयारीतील टोळी जेरबंद

## सहा लाख ५६ हजार रूपयांचा मुद्देमाल जप्त



अहिल्यानगर। प्रतिनिधी

अहिल्यानगर-शहरात दरोडा टाकण्याच्या तयारीत असलेल्या दरोडेखोरांच्या टोळीला स्थानिक गुन्हे शाखेने सापळा रचून जेरबंद केले. या कारवाईत चार जणांना ताब्यात घेण्यात आले असून दोघे पसार झाले आहेत. चौघांच्या ताब्यातून तब्बल सहा लाख ५६ हजार रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.


पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी जिल्ह्यातील दरोडा, घरफोडी व रोड रॉबरी गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी नियमित गस्त व विशेष कारवायांचे आदेश स्थानिक गुन्हे शाखेला दिले होते. त्यानुसार पोलीस निरीक्षक किरणकुमार कबाडी यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक हरीष भोये, उपनिरीक्षक संदीप मुरकुटे, अंमलदार सुनील पवार, गणेश धोत्रे, शाहिद शेख, सुरेश माळी, आकाश काळे, भगवान धुळे, अर्जुन बडे, अरविंद भिंगारदिवे, शिवाजी कावडे यांच्या पथक गस्त घालत असताना शनिवारी (२१ फेब्रुवारी) निरीक्षक कबाडी यांना बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, मध्यप्रदेश राज्यातील एक टोळी विनानंबरच्या पांढऱ्या रंगाच्या स्कॉर्पिओ वाहनातून आगडगावकडून बुऱ्हानगरकडे येत असून शहरात दरोडा टाकण्याच्या तयारीत आहे.मिळालेल्या माहितीच्या आधारे पथकाने बुऱ्हानगर-आगडगाव रस्त्यावर सापळा रचला. दरम्यान, संशयित स्कॉर्पिओ दिसताच पोलिसांनी वाहन अडविले. त्याचवेळी सहा इसमांनी पळ काढला. पोलिसांनी पाठलाग करून चार जणांना ताब्यात घेतले, तर दोघे पसार झाले. सादिकखान इसाकखान (वय ३७), देवसिंग बाबुलाल भिलालाल (वय २४, दोघे, रा. मध्यप्रदेश), दानिश सादिक शेख (वय २४), दानिश अजीज शेख (वय २४, दोघे रा. कापुरवाडी, ता. अहिल्यानगर) अशी ताब्यात घेतल्यांची नावे आहेत. तर, राजाराम फुलेरिया व राजेश परमार (दोघे रा. मध्यप्रदेश) पसार झाले आहेत. ताब्यात घेतलेल्या चौघांची पोलिसांनी अंगझडती व वाहन तपासणी केली असता सादिकखान याच्याकडून एक गावठी कट्टा व जिवंत काडतूस मिळून आले. तसेच धारदार कुकरी, लोखंडी कटावणी, टॉमी, पान्हा, बॅटरी, मिरची पावडर, बांगडी पाईप, पाच मोबाईल फोन, ८०५ लिटर डिझेल आणि विनानंबरची स्कॉर्पिओ असा एकूण सहा लाख ५६ हजार रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणी भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे

# क्रांती चौक ते भवानी माता चौक रस्ता काँक्रिटीकरणाला सुरुवात

## नगरसेवक अमोल गर्जे शाश्वत विकास करण्यासाठी प्रयत्नशील

पाथर्डी प्रतिनिधी

पाथर्डी नगरपालिकेतील प्रभाग पाच मध्ये नवनिर्वाचित नगरसेवक अमोल गर्जे यांनी आ.मोनिका राजळे नगराध्यक्ष, अभय आव्हाड व मुख्य कार्यकारी अधिकारी संतोष लांडगे यांच्या माध्यमातून कचरा सफाई आणि इतर कामांना सुरूवात केली आहे. प्रभागाचा शाश्वत विकास करण्यासाठी ते प्रयत्नशील असल्याचे दिसत आहे.बंदिस्त व साईड गटार दुरुस्ती पिण्याच्या पाण्यासाठी बोरवेल्स, रंगार गल्ली येथे पथदिवे बसवून वयोवृद्ध व्यक्ती व शाळकरी मुलांसाठी अद्यावत गार्डन निर्माण करणे, यासाठी प्रयत्नशील आहेत. क्रांती चौक ते भवानी माता चौक रस्ता काँक्रिटीकरण कामाला सुरुवात झाली असून, प्रभाग पाच मधील विविध नागरी समस्या सोडवण्यावर आणि प्रभागाचा शाश्वत विकास करण्यावर आपला भर असल्याचे नगरसेवक व भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष



अमोल गर्जे यांनी सांगितले. यामुळे पाथर्डीच्या नगरपालिकेतील सर्वात दबंग नगरसेवक म्हणून अमोल गर्जे यांची ओळख बनली आहे.

# मंठा तालुक्यात महसूल समाधान शिबिरांचे आयोजन

मंठा। प्रतिनिधी

नागरिकांना वेळेत व पारदर्शक सेवा देणे ही प्रशासनाची प्राथमिक जबाबदारी आहे तसेच प्रलंबित प्रकरणांचा जलद निपटारा करून प्रत्येक गावात सेवा पोहोचवण्याचा प्रशासनाची व आमचा प्रयत्न आहे . अशी माहिती तहसीलदार सुमन मोरे यांनी दिली आहे.महसूल विभागाच्या सेवा नागरिकांना गावातच , सुलभ आणि पारदर्शक पद्धतीने मिळाव्यात यासाठी मंठा तालुक्यात 'छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबिरांचे' आयोजन ७ मार्च ते १५ एप्रिल या दरम्यान करण्यात येणार आहे.

या शिबिरांमध्ये १५ पेक्षा अधिक सेवा एकाच ठिकाणी उपलब्ध करून देत प्रलंबित अर्ज व प्रकरणांचा तातडीने निपटारा करण्यावर प्रशासनाचा भर राहणार आहे. यामध्ये प्रमाणपत्रे, फेरफार, अकृषिक परवानग्या आदी कामांसाठी तहसील कार्यालयाच्या फेऱ्या माराव्या लागू नयेत, या उद्देशाने शहरात व गावपातळीवर शिबिरे घेतली जाणार आहेत. या शिबीरात तलाठी, मंडळ अधिकारी, नायब तहसीलदार व संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित राहून अर्ज स्वीकृती , कागदपत्रांची तपासणी व तात्काळ कार्यवाही करणार आहेत. कागदपत्रे पूर्ण असल्यास त्याच दिवशी सेवा देण्याचा प्रयत्न राहणार आहे. ग्रामीण भागातील ६ मंडळ स्तरावर ७ मार्च रोजी पांगरी गोसावी, १४ मार्च रोजी तळणी, १० एप्रिल रोजी ढोकसाळ तर १७ एप्रिल रोजी मालतोंडी व जयपूर येथे शिबिरे होणार आहेत. मंठा शहरात ८ मे रोजी व १५ मे रोजी नगर पंचायत मंठा येथे शिबिरांचे आयोजन करण्यात येणार आहे. नागरिकांना वेळेत व पारदर्शक सेवा देणे ही प्रशासनाची प्राथमिक जबाबदारी आहे. प्रलंबित प्रकरणांचा जलद निपटारा करून प्रत्येक गावात सेवा पोहोचवण्याचा आमचा प्रयत्न आहे असे तहसीलदार सुमन मोरे यांनी सांगितले.

# दरोडेखोरांचा धुमाकूळ दोन कुटुंबावर धारदार शस्त्रांनी हल्ला

अहिल्यानगर: अहिल्यानगर तालुक्यातील नारायणडोह व चिंचोडी पाटील या दोन गावांमध्ये दरोडेखोरांनी धुमाकूळ घालत दोन घरांवर हल्ला करून मारहाण व लूट केल्याची घटना घडली. या दोन्ही घटनांमध्ये दोघेजण गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर रूग्णालयात उपचार सुरू आहेत. या प्रकरणी अहिल्यानगर तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. दोन्ही ठिकाणाहून सुमारे १० तोळ्यांचा ऐवज चोरीला गेला असल्याचा अंदाज आहे.

रात्रीच्या वेळी साडेबारा ते एकच्या सुमारास दरोडेखोरांनी चिंचोडी पाटील शिवारातील सुदाम पवार यांच्या कुटुंबाला लक्ष्य केले. अंदाजे पाच दरोडेखारांनी पवार यांच्या घरात घुसून त्यांना मारहाण केली. या मारहाणीत ते जखमी झाले. त्यांच्यावर रूग्णालयात उपचार सुरू आहेत. त्यांच्या घरातून ५० हजाराची रोकड व सुमारे अडीच तोळ्याचे दागिने चोरून नेल्याचे पोलिसांनी सांगितले. दरम्यान, नारायणडोह शिवारात दोन वाजण्याच्या सुमारास पाच अनोळखी दरोडेखोरांनी साठे कुटुंबाच्या घरावर हल्ला करून मारहाण व लूट केली.

# प्रशासकीय अधिकारी व नवतरुणांच्या पुढाकारातून मुख्य रस्त्यावरील खड्डे बुजविले

परतूर प्रतिनिधी

''आपलं गावआपली जबाबदारी'' हा संदेश प्रत्यक्ष कृतीतून साकार करत ता. परतुर येथील दैठणा खुर्द गावातील प्रशासकीय अधिकारी व नवतरुणांनी एक आदर्श निर्माण केला आहे.

गावातील मुख्य रस्त्यावर ट्रॅक्टर व हायवा वाहनांची मोठ्या प्रमाणावर वाहतूक होत असल्यामुळे रस्त्यावर मोठे खड्डे पडले होते. परिणामी नागरिकांना,२४ फेब्रुवारी रोजी विशेषतः शालेय विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक व दुचाकीस्वारांना मोठा त्रास सहन करावा लागत होता. अपघाताचा धोका वाढल्याने ग्रामस्थांमध्ये चिंतेचे वातावरण होते. या परिस्थितीची गांभीर्याने दखल घेत गावातील कर्तव्यदक्ष व लोकाभिमुख प्रशासकीय अधिकाऱ्यांनी तातडीने पुढाकार घेतला. तलाठी श्री. अंकुश चव्हाण, श्री. गणेश कदम, महसूल सहाय्यक अधिकारी श्री. मयूर सवणे, औद्योगिक प्रशिक्षण संस्था कोल्हापूरचे प्रा. श्री. भरत कदम, पुणे येथे कार्यरत असलेले सहशिक्षक श्री. दिनेश ताठे, श्री. ज्ञानेश्वर बाबर, श्री. प्रद्युम्न सवणे, श्री. संदीप काटकर तसेच गावातील सर्व नवयुवक तरुण मंडळी यांच्या संयुक्त प्रयत्नातून हा समाजहिताचा उपक्रम राबविण्यात आला. शासकीय निधीची वाट न पाहता सामाजिक बांधिलकी जपत अधिकाऱ्यांनी स्वतःच्या स्वखर्चातून सिमेंट काँक्रीटद्वारे मुख्य रस्त्यावरील सर्व खड्डे बुजविण्याचे काम हाती घेतले. नियोजनबद्ध व गुणवत्तापूर्ण पद्धतीने हे काम पूर्ण करण्यात आले. प्रशासन व युवकांच्या एकत्रित प्रयत्नामुळे रस्ता सुरक्षित व सुरळीत झाला असून ग्रामस्थांना मोठा दिलासा मिळाला आहे. या उपक्रमामुळे गावात समाधानाचे वातावरण निर्माण झाले असून संबंधित अधिकाऱ्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे. ''आपलं गावआपली जबाबदारी'' या भावनेतून राबविण्यात आलेला हा उपक्रम इतरांसाठी प्रेरणादायी ठरत असून समाजाप्रती असलेली जबाबदारी कशी पार पाडावी याचा उत्तम आदर्श ठरला आहे.

# शक्तीपीठ महामार्गाला परभणीत तीव्र विरोध

परभणी । प्रतिनिधी

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या महत्त्वाकांक्षी शक्तीपीठ महामार्ग प्रकल्पाला परभणी जिल्ह्यातील सहजपूर येथे शेतकऱ्यांनी आज (२० फेब्रुवारी) रस्त्यावर उतरून तीव्र विरोध दर्शवला. भूसंपादनाच्या प्रक्रियेमुळे संतापलेल्या शेतकऱ्यांनी आमच्या जमिनी घेण्यापेक्षा आम्हाला गोळ्या घाला, अशा टोकाच्या घोषणा देत आपला रोष व्यक्त केला. विशेष म्हणजे, अवघ्या ३५० लोकसंख्या असलेल्या या गावात प्रशासनाने ६०० हून अधिक पोलिसांचा फौजफाटा तैनात केल्याचा गंभीर आरोप ग्रामस्थांनी केला. यावर आता काँग्रेस नेते सतेज पाटील आणि स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे अध्यक्ष राजू शेट्टी यांनी सरकारवर हल्लाबोल केला आहे.

सतेज पाटील म्हणाले, गरज नसलेला शक्तीपीठ महामार्ग रेटण्यासाठी महायुती सरकारने दडपशाहीची परिसीमा गाठली आहे. परभणी जिल्ह्यात सहजापूर (जवळा) या गावामध्ये रात्रीपासून शेतकऱ्यांना अटक, घरांवर नोटिसा, आंदोलकांना ताकदीच्या बळावर ताब्यात घेणे आणि महिला भगिनींना फरपटत नेण्याचे निंदनीय प्रकार पोलीसांमार्फत सरकार करत आहे. शेतकऱ्यांचे शांतीपुर्ण आंदोलनाला चिरडण्यासाठी एवढा पोलीस फौजफाटा कशासाठी? सरकार शेतकऱ्यांच्या एकजुटीला घाबरलयं हे नक्की. शेतकऱ्यांवर आत्मदहनाची वेळ आणणाऱ्या जुलमी सरकारचा जाहीर निषेध. तसेच राजू शेट्टी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर टीका करत म्हणाले, पोलिसाकडून शेतकऱ्यांच्या पत्नीचे मंगळसूत्र तोडून रानातून हाकलून लावण्याचा प्रयत्न आहे.

# मनपा आयुक्त बंगल्यालगतचे विश्रामगृह, किल्ला परिसरात कर्मचाऱ्यांचे अतिक्रमण

## अतिक्रमणे हटवा, अन्यथा पेन्शन रोखणार-आयुक्त आशिमा मित्तल

जालना। प्रतिनिधी

प्रलंबित विकासकामे व अनागोंदी कारभारावर ताशेरे ओढत आयुक्त आशिमा मित्तल यांनी सोमवारी महापालिकेत जम्बो बैठका घेतल्या. सर्वच विभागप्रमुखांना त्यांनी फैलावर घेतले. या वेळी विस्कळीत वाहतूक व्यवस्था सुरळीत करणे, रेंगाळलेली कामे पूर्ण करणे, शासकीय जागांवरील अतिक्रमण तातडीने हटवणे, असे आदेश दिले. किल्ला परिसरातील (जुनी नगर परिषद इमारत) व मोतीबागेसमोर मनपा आयुक्तांच्या निवासस्थानालगत असलेल्या विश्रामगृहात बेकायदा राहणारे नागरिक पालिका कर्मचारी असल्याचे निदर्शनास येताच त्यांनी तातडीने इमारत रिकामी करण्याचे आदेश दिले. अन्यथा संबंधितांची पेन्शन थांबवून दंड आकारला जाईल, असा इशाराही त्यांनी दिला. त्यामुळे दशकानुदशके ठाण मांडून असलेले पालिका कर्मचारी स्वतःहून इमारती रिकामी करतात की कारवाईला सामोरे जातात, हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.

जालना शहरात शासकीय असो की खासगी, क्षेत्रावर अतिक्रमण करून राहणाऱ्यांची मोठी समस्या आहे. यात निवासी तसेच व्यापारी प्रतिष्ठानांचा समावेश आहे. स्व-उत्पन्न वाढवण्याच्या उद्देशाने नगरपालिकेकडून बांधण्यात आलेल्या अनेक मालमत्ता धनदांडग्यांच्या ताब्यात आहेत. स्वातंत्र्यवीर जलतरण तलावाच्या दुरुस्तीला एक वर्ष उलटूनही केवळ २ टक्के काम झाले. रेल्वे उड्डाणपुलालगत उभारलेले ई-व्ही चार्जिंग स्टेशन ३ वर्षांपासून पडून आहे. हे केंद्र कार्यान्वित करण्याच्या सूचना आयुक्तांनी दिल्या. शहरातील रस्त्यांवर मोकाट फिरणाऱ्या जनावरांमुळे होणारे अपघात, वाहतुकीची कोंडी टाळण्यासाठी पशुपालकांनी काळजी घ्यावी. रस्त्यावर मोकाट फिरणारी जनावरे गोशाळेत जमा केली, तर संबंधित मालकाचा हक्क राहणार नाही. नियमांचे उल्लंघन करत जनावरे मोकाट सोडणाऱ्या मालकांना आर्थिक दंड आकारला जाईल. पशुपालकांनी सहकार्य करावे, अन्यथा जप्त केलेली जनावरे परत मिळणार नाहीत, असा इशाराही मनपाकडून देण्यात आला. ठिकठिकाणी मांस विक्रेत्यांनी अतिक्रमण केले आहे. प्रत्येक चौकात जैसे थे झालेली मांसविक्रीच्या दुकानांवरील अतिक्रमण हटाव मोहीम तीव्र केली जाईल. नवीन जालन्यातील फुले मार्केटबाहेर बसणाऱ्या फेरीवाल्यांकडून गोळा होणाऱ्या दैनंदिन २० रुपये वसुलीचा संपूर्ण हिशेब सादर करण्याचे आदेशही मित्तल यांनी दिले. मोतीबागेचा कायापालट करण्यासाठी फॉलोअप प्लॅन तयार केला आहे. त्यात चौपाटी परिसर, सनसेट पॉइंट, ग्लो गार्डन, कारंजे, पक्ष्यांच्या घरट्यांचे नूतनीकरण केले जाईल. ६ उद्यानांचा विकास, भटक्या कुत्र्यांसाठी निवारा, उघड्या ड्रेनेजची दुरुस्ती, दुभाजकांची स्वच्छता, महापालिका शाळांचे नूतनीकरण आदी सुधारणा केली जाईल, असे मित्तल यांनी सांगितले.

# मोसा येथे सेवालाल महाराज मंदिराचे भूमिपूजन



मंठा। प्रतिनिधी

मोसा तांडा ता. मंठा येथे संत श्री सेवालाल महाराज मंदिराचे भूमीपुजन रविवारी ( ता. २२) रोजी प.पू.तपस्वी श्री गुरु योगानंद महाराज यांच्या हस्ते करण्यात आले.

या प्रसंगी सांस्कृतिक कार्यक्रम लेंगी,भजन आदी कार्यक्रम घेण्यात आले. परमपूज्य योगानंद महाराज यांनी प्रवचनातून समाजप्रबोधन केले. सत्संगामुळे मनुष्य जीवन सार्थक असा उपदेश केला. यावेळी महिला व समाज बांधवांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# न्यायालयात चक्क वकिलालाच मारहाण

**बीड | प्रतिनिधी**

**बीड जिल्हा आणि सत्र न्यायालय परिसरात वकिलाच्या टेबलासमोर गाडी लावल्याच्या कारणावरून काही लोकांकडून थेट वकिलाला मारहाण झाली. यानंतर बार काउन्सिल च्या वतीने सर्व वकिलांनी शिवाजीनगर पोलीस ठाण्यात धाव घेतली व पोलीस अधीक्षकांची देखील भेट घेतली असून मारहाण करणाऱ्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला.**

बीड जिल्हा न्यायालयात प्रॅक्टिस करणारे अॅड.राम डोंगरे हे आपले कामकाज करत बसले असताना दुपारीच बारा ते साडेबारा वाजण्याच्या सुमारास राधाकिसन करपे आणि तीन चार महिला आणि पुरुष त्यांच्याकडे आले. या लोकांनी अचानक बाचाबाची आणि शिवीगाळ करत वकील डोंगरे यांना मारहाण करण्यास सुरवात केली. त्यानंतर वकिलांनी हा सगळा प्रकार न्यायाधीश यांच्या कानावर घालून शिवाजीनगर पोलिसात धाव घेतली.जिल्हा न्यायालयाच्या परिसरामध्ये थेट वकिलांवर अशा प्रकारे हल्ला होऊन मारहाण होण्याची घटना प्रकार निंदनीय असल्याचे जाहीर करत वकील सांघटनेकडून निषेध नोंदवण्यात आला आहे.





## टेबल समोर गाडी लावण्याचे कारण

बीड जिल्हा न्यायालयात मंगळवारी दुपारीच बारा वाजण्याच्या सुमारास मोठा गोंधळ उडाला. वकील संघांचे सदस्य असलेले अॅड राम पांडुरंग डोंगरे यांना शाहूनगर भागातील राधाकिसन करपे व इतरांनी मारहाण केली. याविरोधात तक्रार देण्यासाठी वकिलांनी पोलीस अधीक्षक आणि शिवाजीनगर पोलिसात धाव घेतली. वकील संघांचे पदाधिकारी आणि सर्व वकील बांधव शिवाजीनगर पोलीस ठाण्यात गेल्यानंतर पोलीस निरीक्षक प्रवीण बांगर यांनी त्यांच्या विरोधात महिलेने तक्रार दाखल केली असून तुम्ही तक्रार द्या मी ती पण दाखल करून घेतो असे सांगितले. त्यानंतर संतप्त झालेल्या वकिलांनी थेट पोलीस अधीक्षक कार्यालय गाठले.दरम्यान या प्रकरणी वकील राम डोंगरे यांच्याविरोधात महिलेने तक्रार दिली असल्याची माहिती पोलिस निरीक्षक प्रवीणकुमार बांगर यांनी दिली.

**पोलीस अधीक्षकांना निवेदन**

बीड जिल्हा व सत्र न्यायालय येथे वकील बंधूस मारहाण प्रकरणी सर्व वकील बांधवांच्या वतीने निषेध नोंदवला. तसेच आरोपीस वरती लवकरात लवकर गुन्हा दाखल करून त्यांना तात्काळ अटक करण्यात यावे व त्यांच्यावर कठोर कारवाई करावी या मागणीसाठी बीड जिल्हा वकील संघाचे सर्व सदस्य सर्व वकील बंधू महिला वकील भगिनी यांनी बीड जिल्हा पोलीस अधीक्षक, व शिवाजीनगर पोलीस यांच्यापर्यंत निरीक्षक यांना निवेदन दिले.

# पाटोदा तहसिलचा डबल पंचनाम्याचा जावईशोध?

## सहा महीने उलटुनही अतिवृष्टीतील नुकसानग्रस्त शेतकऱ्यांची मदत नुसती कागदावरच!

पाटोदा । प्रतिनिधी

'वरातीमागून घोडे' नाचवण्यात पाटोदा तहसील प्रशासन सध्या आघाडीवर असल्याचे चित्र दिसत आहे. तालुक्यात अतिवृष्टी होऊन आणि घरांची पडझड, पशुधनाचे नुकसान होऊन तब्बल सहा महिन्यांचा काळ लोटला आहे. मात्र, अद्यापही बाधितांच्या पदरात मदतीचा एक रुपयाही पडलेला नाही. उलट, आता सहा महिन्यांनंतर पुन्हा 'डबल पंचनामे' करण्याचा अजब फतवा काढत प्रशासनाने आपला 'जावईशोध' लावला आहे, ज्यामुळे शेतकऱ्यांमधून तीव्र संताप व्यक्त होत आहे.

जुने पंचनामे गेले कुठे?

अतिवृष्टी झाल्यानंतर तत्काळ तलाठी, मंडळ अधिकारी आणि पशुवैद्यकीय अधिकारी यांनी बांधावर जाऊन नुकसानीचे पंचनामे केले होते. मग आता सहा महिन्यांनी पुन्हा पंचनामे करण्याची गरज का पडली? असा सवाल उपस्थित होत आहे. जर आधी केलेले पंचनामे अधिकृत होते, तर ते गहाळ झाले की प्रशासनाने जाणीवपूर्वक दडपले? आणि जर ते पंचनामे खोटे होते, तर संबंधित कामात कुचराई करणाऱ्या अधिकाऱ्यांवर अद्याप गुन्हे का दाखल झाले नाहीत? असा रोखठोक प्रश्न संतप्त जनता विचारत आहे.

शेतकऱ्यांची ससेहोलपट

अनेक शेतकऱ्यांचे पशुधन पुरात वाहून गेले, तर काहींची घरे कोसळून ते उघड्यावर आले. "सहा महिने झाले, डोळ्यांसमोर वाहून गेलेल्या जनावरांचे दुःख पचवून आम्ही मदतीची वाट पाहत होतो. आता पुन्हा तेच पंचनामे करायचे म्हणजे ही जखमेवर मीठ चोळण्याचा प्रकार आहे," अशी भावना एका पीडित शेतकऱ्याने व्यक्त केली.

प्रशासकीय दिरंगाईचा कळस

एकीकडे सरकार मदतीच्या घोषणा करत असताना, दुसरीकडे पाटोदा तहसील कार्यालयातील ढिम्म कारभारामुळे सर्वसामान्यांचे हाल होत आहेत. सहा महिन्यांपूर्वी पुराचे पाणी असताना जे पुरावे अधिकाऱ्यांनी पाहिले, ते आता उन्हाळ्यात कसे मिळणार?

# योग्य वेतन श्रेणीसाठी निमशासकीय अधिकारी व कर्मचारी यांचे असहकार आंदोलन

बीड प्रतिनिधी

वेतन त्रुटी तात्काळ दूर करून योग्य वेतनश्रेणी लागू करणे,पदोन्नती प्रक्रियेला गती देऊन वरिष्ठतेनुसार न्याय देणे,रिक्त पदे तातडीने भरून कामाचा ताण कमी करणे यासह अन्य मागण्यांसाठी जय महाराष्ट्र शासकीय निमशासकीय अधिकारी व कर्मचारी संघटनेच्या बीड जिल्हा शाखांच्या वतीने मंगळवारी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर असहकार आंदोलन करण्यात आले.




वेतन त्रुटी तात्काळ दूर करून योग्य वेतनश्रेणी लागू करणे,पदोन्नती प्रक्रियेला गती देऊन वरिष्ठतेनुसार न्याय देणे,रिक्त पदे तातडीने भरून कामाचा ताण कमी करणे,समान कामासाठी समान वेतनाची अंमलबजावणी,सेवा अटी व नियमांमध्ये सुधारणा करून कर्मचाऱ्यांना दिलासा देणे,जुन्या प्रलंबित भत्ते व देयके तातडीने अदा करणे या मागण्यांसाठी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर कामबंद आंदोलन करण्यात आले. प्रलंबति लिपीक संवर्गातील कर्मचाऱ्यांना चौथा वेतन आयोगापासुनची वेतनत्रृटी दूर करुन सुधारीत वेतन श्रेणी लागू करणे, पदनामात बदल करणे व पदोन्नतीचे साखळी कमी करणे. सर्वांना जशास जशी जुनी पेन्शन योजना लागू करणे.१नोव्हेंबर २००५ पूर्वी अनुकंपाच्या प्रतिक्षासुचीवर असलेल्या सर्वांना जुनी पेन्वान लागू करणे, जिल्हा परिषद मधील अधिकारी / कर्मचा-यांचे समावेशन मृद व जलसंधारण विभागामध्ये न करणेबाबत यास अन्य प्रमुख मागण्यासाठी कर्मचाऱ्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर असहकार आंदोलन करून मागण्याची निवेदन जिल्हाधिकारी यांच्याकडे सादर केले.

# आष्टीच्या कृषी प्रदर्शनास नव शेतकऱ्यांचा प्रतिसाद

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यामध्ये सुरू असलेल्या कृषी प्रदर्शनामध्ये अनेक शेतकऱ्यांनी सहभाग नोंदवला या प्रदर्शनामध्ये नवनवीन तंत्रज्ञान घेण्यासाठी अनेक नव शेतकऱ्यांनी हजेरी लावली विशेषता पारंपरिक शेतीपेक्षा वेगळे काहीतरी करण्याची क्षमता निर्माण व्हावी यासाठी शेतकऱ्यांचा ओढा माहिती घेण्यासाठी येत आहे.

आज तिसऱ्या दीवशी देखील कृषी प्रदर्शनाला चांगला प्रतिसाद जवळपास ३० ते ३५ हजार लोकांनी कृषी प्रदर्शनाचा लाभ घेतला कृषी प्रदर्शन आष्टी व आष्टी परिसरातील गावकऱ्यांसाठी एक पर्वणी ठरते कृषी प्रदर्शनाच्या स्टॉलच्या माध्यमातून मोठ्यां पासून लहानांपर्यंत विविध वस्तू आयुर्वेदिक औषधे,पावडर, तसेच अत्याधुनिक उपकरणे ,अशा अनेक वेगवेगळ्या प्रकारच्या स्टॉल उभारली गेली होती.या मधून अनेकांनी खरेदी केली आजच्या शेवटच्या दिवशी देखील मोठ्या प्रमाणावर गर्दी दिसून आली कृषी प्रदर्शनामध्ये चर्चेचा विषय ठरला चायना सुलतान जातीचे बोकुड तसेच बालगोपाळांसाठी खाऊ गल्ली मेजवानी देखील चांगल्या प्रकारे होते साउथ इंडियन पदार्थ ,तसेच



◀◀ पान ३ वर



## चंद्रभागा पोद्दार लर्न स्कूलमध्ये गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान उत्साहात संपन्न

दिंद्रुड । प्रतिनिधी

येथील पोद्दार लर्न स्कूल येथे संत गाडगेबाबा जयंतीच्या औचित्याने ग्रामस्वच्छता अभिमान राबवण्यात आले. शाळेसह आवारात स्वच्छता मोहीम राबविण्यात आली.शिक्षकवृंदासह विद्यार्थी उत्साहात या उपक्रमात सहभागी झाले होते.

या प्रसंगी शाळेचे अध्यक्ष अतुलजी ठोंबरे सह मुख्याध्यापक निलेश निंदाने, शाळेचे समन्वयक राजेंद्र पांडे, ज्योती मोरे यांची प्रमुख उपस्थिती होती. संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेचे पूजन व अभिवादन

◀◀ पान ३ वर

# आष्टी पंचायत समितीचे माजी सदस्य बाबासाहेब गर्जे यांचे निधन

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील हातोला ग्रामपंचायतीचे सरपंच तथा आष्टी पंचायत समितीचे माजी सदस्य बाबासाहेब ज्ञानदेव गर्जे यांचे निधन झाले.त्यांच्या निधनाने हातोला गावासह परिसरावर दुःखाची छाया पसरली आहे. समाजकार्यात नेहमी अग्रेसर असलेल्या या मनमिळावू व्यक्तिमत्त्वाच्या जाण्याने सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे.सोमवार दि. २३ फेब्रुवारी रोजी सकाळी ९ वाजता हातोला येथील गर्जेवस्ती येथे त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले.अंत्यविधी अत्यंत शोकाकुल वातावरणात पार पडला. गावकरी, नातेवाईक,मित्रपरिवार तसेच सामाजिक,राजकीय,शैक्षणिक व धार्मिक क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित राहून त्यांनी अखेरचा निरोप दिला.



कै. बाबासाहेब गर्जे यांनी पंचायत समिती सदस्य म्हणून कार्य करताना सर्वसामान्य जनतेशी आपुलकीचे व जिव्हाळ्याचे संबंध प्रस्थापित केले होते.गावाच्या विकासासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले.साधी राहणी, स्पष्टवक्तेपणा, शांत,संयमी आणि समाजहिताची तळमळ ही त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची वैशिष्ट्ये होते.यावेळी ह.भ.प. अशोक महाराज, ह.भ.प. रोहिदास महाराज, ह.भ.प. किशोर महाराज, देविदास धस,महेश कारखान्याचे चेअरमन राजेंद्र धोंडे,माजी जिल्हा परिषद अध्यक्ष विजय गोल्हार,एन. टी.गर्जे,शिवाजी नाकाडे,चेअरमन आदिनाथ सानप, माजी सरपंच नामदेव राऊत, नवनाथ विधाते,अॅड. भाऊसाहेब लटपटे, सरपंच दत्तात्रय खोटे, आत्माराम फुंदे, सरपंच अभय गर्जे, यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

# दारूच्या तर्रर नशेत घेतली एसपींची भेट पोलीस कर्मचाऱ्यावर गुन्हा दाखल होणार

**बीड | प्रतिनिधी**

पोलीस अधिक्षक नवनीत कॉवत यांच्या निवासस्थानाचे काम सुरु असताना एका पोलीस कर्मचाऱ्याला गांजा ओढताना एसपींनी रंगेहात पकडल्याची घटना काही दिवसांपूर्वी घडली होती.यात दोषी कर्मचाऱ्यावर शिवाजीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करून त्या कर्मचाऱ्याला निलंबित केले होते.आता अशीच एक घटना घडली आहे.थेट पोलीस अधिक्षक यांच्या कॅबिनमध्येच दारूच्या तर्रर नशेत गेलेल्या पोलीस कर्मचाऱ्याची वैद्यकीय तपासणी करण्याचे आदेश नवनीत कॉवत यांनी दिले.सदर कर्मचाऱ्याची अल्कोल तपासणी पॉझिटिव्ह आल्यावर त्याच्यावर शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु असल्याचे कळते.

मिळालेल्या माहितीनुसार एका कर्मचाऱ्याला लातूर येथे ट्रेनिंगसाठी पाठविण्यात आले होते.मात्र तो त्या ठिकाणी गेला नाही.बीडमध्येही कर्तव्यावर रुजू झाला नाही.काही दिवसांच्या विश्रांतीनंतर तो कामावर रुजू होण्यासाठी गेल्यानंतर एसपींना आधी भेटा असे सांगण्यात आले.मात्र थेट एसपीं पुढे जाण्याची हिंमत होत नसल्याने असेल कदाचित त्यामुळे त्या कर्मचाऱ्याने दारू ढोसली.दारूच्या तर्ररर नशा झाल्यानंतर त्याने एसपींच्या कॅबिनमध्ये पाऊल ठेवले आणि आपले म्हणणे मांडणे सुरु केले.मात्र एसपींना संशय आल्याने त्यांनी थेट सदर कर्मचाऱ्याची अल्कोल तपासणीचे आदेश दिले.त्यानुसार जिल्हा रुग्णालयात तपासणी झाल्यानंतर यात त्याचा अहवाल पॉझिटिव्ह असल्याचे कळते.सध्या शहर पोलीस ठाण्यात याप्रकरणी गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु झाली असून त्या कर्मचाऱ्याला निलंबित देखील करण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.

यापूर्वीही झाले होते निलंबन

एसपींच्या कॅबिनमध्ये दारूच्या तर्रर नशेत गेलेल्या कर्मचाऱ्यावर शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु असली तरी ते कर्मचाऱ्याचे यापूर्वीही एकदा निलंबन झाल्याची माहिती आहे.तत्कालीन पोलीस अधिक्षक नंदकुमार ठाकूर यांनी वादग्रस्त असलेल्या या कर्मचाऱ्याला एकदा दणका दिला होता.आता पुन्हा एकदा नवनीत कॉवत हे त्या कर्मचाऱ्यावर कारवाई करत असल्याचे संकेत आहेत.

# शांतीब्रम्ह नवनाथ बाबा यांची बक्करवाडीत मिरवणूक

## बीड, मौजवाडी फाटा,ढेकाणमोह, टेकडी फाटा, येथे स्वागत

बीड । प्रतिनिधी

श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी मठाधिपती महंत गुरुवर्य शांतीब्रम्ह नवनाथ बाबा महाराज यांची दोन धाम यात्रा रामटेक नागपूर, मैहर शरद देवी, प्रयागराज, वाराणशी (काशी) गोरखपुर, पशुपतिनाथ नेपाळ,मनोकामनादेवी नेपाळ, चंद्रगिरी नेपाळ, भोलेश्वार नेपाळ, अयोध्या, चित्रकूट, मंदाकिनी नदी आरती, उज्जैन महाकालेश्वर, काळभैरव, ओंकारेश्वर, मुक्ताई नगर, बीड असा दोनधाम यात्रा प्रवास

पूर्ण झाल्यावर मंगळवारी बीड येथे आगमन झाले. शांतीब्रह्म नवनाथ बाबा महाराज यांचे बीड मध्ये भव्य स्वागत करण्यात आले. बक्करवाडी ग्रामस्थांच्या वतीने ढोल ताशा लेझीम वाजवत गावातील लहान, थोर, महिला व पुरुष मंडळींनी बक्करवाडी फाटा ते बक्करवाडी येथे रथा मधून भव्य मिरवणूक गुरुवर्य शांती ब्रह्मा नवनाथ बाबा महाराज यांचे दोन धाम यात्रा पूर्ण झाल्याबद्दल काढण्यात आली. तसेच संपूर्ण गावामध्ये महाप्रसादाची पंगत आयोजन करण्यात आले.



मौजवाडी फाटा येथे मौजवाडी ग्रामस्थांच्या वतीने स्वागत सत्कार करण्यात आला. ढेकणमोहा ग्रामस्थांच्या वतीने ढेकणमोहा येथे स्वागत करण्यात आले. श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथील भाविक भक्तांनी गोरक्षनाथ टेकडी फाटा परिसरात फटाके फोडत बाबांचे भव्य स्वागत करण्यात आले. बीडच्या वेशात खांडे व लांडे कुटुंबाकडून हॉटेल सनराइज्? येथे स्वागत समारंभ घेण्यात आला. बीड येथे नवनाथ बाबा समवेत दोन धाम यात्रा करणाऱ्या घुमरे कुटुंबाकडून स्वागत करण्यात आले.

गुरुवर्य शांतीब्रम्ह नवनाथ बाबा महाराज यांच्या १५ दिवसाच्या दोन धाम यात्रा मध्ये रमेश घुमरे यांच्या कुटुंबाने बाबाची खूप सेवा करण्यात आली

# धारूर तालुक्यातील डोंगर पट्ट्यात अवकाळी पावसाचा फटका

## ज्वारी,बाजरी,गहू,मिरची,खरबूज,आंबा फळबागांचे मोठे नुकसान;तातडीच्या मदतीची मागणी

वडवणी । प्रतिनिधी

धारूर तालुक्यातील तेलगाव महसूल मंडळातील डोंगरपट्ट्यात काल दुपारी अचानक झालेल्या वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसाने शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान केले. पहाडी पारगाव,पहाडी दहीफळ, ढगेवाडी, चारदरी, धुनकवाड, थेटेगव्हणसह परिसरातील अनेक गावांमध्ये या पावसाने अक्षरशः धुमाकूळ घातला. ज्वारी, बाजरी, गहू, कांदा, मिरची तसेच खरबूज,टरबूज, आंबा पिकांना जोरदार फटका बसला असून उभी पिके जमीनदोस्त झाली आहेत. त्यामुळे शेतकरीवर्ग हवालदिल झाला आहे.

दुपारनंतर अचानक वातावरणात बदल होऊन गडगडाट, विजांचा कडकडाट आणि वेगवान वाऱ्यासह मुसळधार पावसाने हजेरी लावली. अनेक शेतांमध्ये वाऱ्याच्या तडाख्यामुळे पिके आडवी झाली आहेत. विशेषतः ज्वारी, गहू, हरभरा, तूर ही पिके काढणीच्या अंतिम टप्प्यात होती. काही ठिकाणी गहू काढणीस तयार होते. मात्र या अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांचे सर्व श्रम आणि खर्च वाया गेल्याची भावना व्यक्त होत आहे. डोंगरपट्ट्यातील आंबा बागांनाही मोठा फटका बसला आहे.





◀◀ पान ३ वर

# पिंपरखेड येथील दोन शेतकऱ्यांच्या बैलजोडी चोरीला

**वडवणी | प्रतिनिधी**

घरासमोरील पत्राच्या निवाऱ्याखाली बांधलेल्या दोन शेतकऱ्यांच्या बैल जोडी मध्यरात्री अज्ञात चोरट्यांनी चोरुन नेल्याची घटना वडवणी तालुक्यातील मौजे पिंपरखेड गावी घडली आहे. पोलिसांनी घटनास्थळी जाऊन पंचनामा केला आहे. तर दुपारपर्यंत या संदर्भात पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल झालेला नाही. असे सांगण्यात आले आहे.

मौजे खळवट लिमगाव या ठिकाणी अज्ञात पाच ते सहा अज्ञात चोरट्यांनी दोन ठिकाणी सशस्त्र दरोडा टाकून सोन्यासह रोख रक्कम लांबपास केली होती. या घटनेला दहा दिवस पूर्ण होताच आता अज्ञात चोरट्यांनी पिंपरखेड येथील दोन शेतकऱ्यांच्या बैल जोड्यांवर नजर ठेवली. यामध्ये श्रीकृष्ण त्रिंबक निपटे व बद्रीनाथ राजाराम साबळे या दोघांचे ही घर हे कवडगाव रोड लगत अगदी काही अंतरावर आहेत. या दोघांनी घरासमोरील पत्राच्या शेडच्या निवाऱ्याखाली ही बैल जोड बांधली होती. मध्यरात्री एक ते साडेतीन वाजण्याच्या सुमारास अज्ञात चोरट्यांनी सदरील बैल जोडी बांधलेल्या दाव्याला चाकूच्या साह्याने कापून त्या बैल जोड्यांचे घुंगरू देखील कापले, जेणे करून या घुंगराचा आवाज येऊ नये. ही शक्कल लढवली व या दोन बैल जोड्या अज्ञात चोरट्यांनी चोरून नेल्या आहेत. यामुळे सदरील शेतकऱ्यांचे जवळपास दीड लाखापेक्षा अधिक नुकसान झाले आहे. तर ही घटना समजतात वडवणी पोलीस स्टेशनचे कर्मचारी तुकाराम ढोबळे व काकडे या दोन कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेत सदरील घटनेचा पंचनामा केला आहे. तर दुपारी एक वाजेपर्यंत वडवणी पोलीस स्टेशनमध्ये या संदर्भात गुन्हा दाखल झालेला नव्हता. तर या घटनेवरून वडवणी पोलिसांसमोर चोरट्यांनी तपास करण्याचे आव्हान उभा केले आहे का ? असा प्रश्न देखील उपस्थित राहत आहे.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा...नवे विचार...
पुणे विशेष
बुधवार दि.२५ फेब्रुवारी २०२६ । पान ७

# पुणे विद्यापीठ कुलसचिव निवडीवरून 'रणकंदन'! वादग्रस्त उमेदवारासाठी प्रशासनाचा अट्टाहास का?

पुणे । प्रतिनिधी

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या कुलसचिव पदाच्या नियुक्तीवरून मोठे वादंग निर्माण होण्याची चिन्हे आहेत. येत्या शुक्रवारी होणाऱ्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत यावर शिक्कामोर्तब होण्याची शक्यता असतानाच, एका ठराविक उमेदवारासाठीच प्रशासनाचा अट्टाहास का, असा संतप्त सवाल शैक्षणिक वर्तुळातून विचारला जात आहे. या नियुक्तीवरून अधिसभा सदस्यांसह विद्यार्थी संघटनांनी आता थेट जनआंदोलन छेडण्याचा इशारा दिला आहे.



पडद्यामागून हालचाली करून एका विशिष्ट व्यक्तीची वर्णी लावण्याचा प्रयत्न उघडकीस आल्यानंतर अधिसभा सदस्य डॉ. हर्ष गायकवाड यांनी कुलगुरूंना याबाबतचे निवेदन देत या विषयाकडे लक्ष वेधले आहे. ज्या उमेदवाराच्या नावाची चर्चा आहे, त्यांच्यावर एका नामांकित महाविद्यालयात गंभीर तक्रारी असून, त्या कारणास्तव त्यांना विश्वस्त पदाचा राजीनामा द्यावा लागला होता, असा दावा या निवेदनात केला आहे.

दरम्यान, संबंधित उमेदवाराविरुद्ध त्याच्या मूळ संस्थेने शिस्तभंगविषयक चौकशी समिती नेमली आहे. इतकेच नव्हे, तर संस्थेने विद्यापीठाला दिलेले ना हरकत प्रमाणपत्रदेखील मागे घेतले आहे. तांत्रिक आणि नैतिकदृष्ट्या अपात्र ठरत असतानाही, त्याच उमेदवाराला कुलसचिव पदासारख्या जबाबदार खुर्चीवर बसवण्याचा प्रयत्न विद्यापीठाची प्रतिमा मलीन करणारा ठरेल, असा इशारा डॉ. गायकवाड यांनी दिला आहे. अशा व्यक्तीला नियुक्ती दिली, तर समाजमाध्यमांतून आणि शैक्षणिक वर्तुळातून विद्यापीठाच्या प्रतिमेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जाईल, असेही डॉ. गायकवाड यांनी निवेदनात म्हटले आहे. संबंधित व्यक्तीच्या निवडीला यापूर्वीच आम्ही विरोध केला आहे. अशा वादग्रस्त व्यक्तीला घेण्याचा अट्टाहास का केला जात आहे? कुलगुरूंनी नियमांचे उल्लंघन करत त्याच व्यक्तीला निवडीची अट्टाहास कायम ठेवला, तर पूर्वीपेक्षा जास्त तीव्र आंदोलन करण्याचा इशारा विद्यापीठ विद्यार्थी संघर्ष कृती समितीचे राहुल ससाणे यांनी दिला आहे.विद्यापीठाच्या प्रशासकीय कामकाजासाठी पूर्ण वेळ कुलसचिव पदाची नियुक्ती करणे आवश्यक आहे. विद्यापीठ कायद्यानुसार नियुक्तीची सर्व प्रक्रिया पूर्ण करून नियमानुसार नियुक्ती होणे महत्त्वाचे आहे. तब्बल दीड वर्षांनंतर त्याच व्यक्तीची नियुक्ती करण्यासाठी विद्यापीठ प्रशासनाने तत्परनेने कार्यवाही करणे संशयास्पद आहे. त्यामुळे नियमाला आधीन राहून नियुक्तीची प्रक्रिया पूर्ण व्हावी, अशी अपेक्षा शिक्षण तज्ज्ञांकडून व्यक्त होत आहे.

## कात्रज घाटात भीषण अपघात! सळ्यांनी भरलेल्या ट्रकची बसला धडक; चालकाचा मृत्यू



पुणे । प्रतिनिधी

कात्रज नवीन बोगदाकडून नवले ब्रिजकडे येताना दरी पुलाजवळ जांभुळवाडी या ठिकाणी लोखंडी पाईप भरलेल्या ट्रकने बसला पाठीमागून धडक दिल्याने भीषण अपघाताची घटना घडली आहे.

या अपघातात बसमधील काही प्रवासी किरकोळ जखमी झाले आहेत. ट्रक चालकाला रुग्णालयात दाखल केल्यानंतर त्याचा मृत्यू झाल्याची प्राथमिक माहिती पोलिसांनी दिली आहे. अपघातात चार ते पाच जण जखमी झाले असून, या अपघातात ट्रकचा क्लीनर हा अद्याप लोखंडी सळ्या व ट्रकचा केबिन यामध्ये अडकल्याची प्राथमिक माहिती आहे. या अपघाताची माहिती मिळताच पोलीस अग्निशमन तसेच राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे पेट्रोलिंग पथक देखील दाखल झाले होते. भल्या पहाटे झालेल्या या अपघातामुळे महामार्गावर मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी झाली होती. पहाटेच्या वेळीही वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्याचे चित्र दिसून आले. अपघाताचे नेमके कारण शोधण्यासाठी पोलिसांकडून पुढील तपास केला जात आहे.



## पुरंदर विमानतळाचा मार्ग मोकळा! ६ हजार कोटींचे कर्ज मंजूर; शेतकऱ्यांच्या खात्यात लवकरच येणार रक्कम


पुणे

पुरंदर येथील प्रस्तावित छत्रपती संभाजीराजे आंतरराष्ट्रीय विमानतळासाठी संपादित करण्यात येणाऱ्या ३ हजार एकर जमिनीसाठी ६ हजार कोटी रुपयांचे कर्ज मंजूर करण्यात आले. ही प्रक्रिया अंतिम टप्प्यात असून, पुढील पंधरा दिवसांत शेतकऱ्यांना भूसंपादनाचा मोबदला देण्यात येईल, अशी माहिती जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी दिली. गेल्या महिन्यात राज्य मंत्रिमंडळ बैठकीत झालेल्या निर्णयानुसार राज्य सरकारने विमानतळासाठी आवश्यक असणाऱ्या सहा हजार कोटींच्या निधीसाठी कर्ज उभारणीस मान्यता दिली आहे. कर्ज उभारणीसाठी विशेष प्राधिकरणही स्थापना करण्यात आले असून, त्यामध्ये एमआयडीसी, एमएडीसी आणि सिडको यांचा समावेश आहे. या तीन संस्थांमध्ये सिडकोचा सर्वाधिक भाग असणार असून, यासंदर्भातील अंतिम निर्णय राज्य सरकार घेणार आहे. या भूसंपादनाचा मोबदला देण्यासाठी कर्ज उभारणीस आणखी पंधरा दिवसांचा कालावधी लागणार आहे.या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी डुडी म्हणाले, की या निधीतून मोबदल्याची रक्कम शेतकऱ्यांचा खात्यावर थेट जमा करण्यात येणार आहे. ही प्रक्रिया जवळपास अंतिम टप्प्यात आली आहे.

## राजकारणाचे शुद्धीकरणासाठी प्रतिभावान तरुणांची गरज; अनुराग सिंह ठाकूर यांचे प्रतिपादन

पुणे । प्रतिनिधी

धोरणनिर्मिती, प्रशासन आणि सार्वजनिक सेवेतील गुंतागुंत समजून घेऊन तरुणांनी राजकीयदृष्ट्या कुशल आणि सामाजिकदृष्ट्या संवेदनशील होणे काळाची गरज आहे. राजकारणाला शुद्ध करण्यासाठी सक्षम आणि प्रतिभावान तरुणांनी या क्षेत्रात प्रवेश करावा, असे आवाहन खासदार अनुराग सिंह ठाकूर यांनी केले. एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटी आणि एमआयटी स्कूल ऑफ गव्हर्नमेंटतर्फे योजित १५ व्या भारतीय छात्र संसदेच्या समारोप प्रसंगी ते बोलत होते.



या वेळी व्यासपीठावर माजी खासदार शाहिद सिद्दीकी, खासदार डॉ. संदीप कुमार पाठक, छात्र संसदेचे संस्थापक डॉ. राहुल कराड, कुलगुरू डॉ. आर. एम. चिटणीस आणि सीएओ डॉ. प्रसाद खांडेकर उपस्थित होते. ठाकूर म्हणाले, की २१ व्या शतकात कॅम्पस ते कॅबिनेट असा प्रवास करताना तरुणांनी कृत्रिम बुद्धिमत्तेच्या नैतिकतेशी जुळवून घेतले पाहिजे. गेल्या दशकात देशातील शिक्षण क्षेत्रात आमूलाग्र बदल झाले असून, आयआयटी, आयएमएम आणि विद्यापीठांच्या संख्येत मोठी वाढ झाली आहे.

आत्मनिर्भर भारतासाठी सेमीकंडक्टर आणि हेल्थकेअर क्षेत्रात अतुलनीय वृद्धी होत असून विरोधकांनीही तर्क आणि तथ्यांच्या आधारे राजकारण करावे. सिद्दीकी यांनी तरुणांना तंत्रज्ञानावर पूर्णतः अवलंबून न राहता मानसिकतेत बदल करण्याचे आवाहन केले. डॉ. पाठक यांनी विद्यापीठांमध्ये निवडणुका होणे गरजेचे असल्याचे सांगत, मूल्याधिष्ठित राजकारणातूनच देशाचे भविष्य उज्ज्वल होईल, असा विश्वास व्यक्त केला. डॉ. राहुल कराड यांनी भ्रष्टाचार, जातिवाद आणि वसाहतवादी मानसिकतेत बदल घडवण्याची गरज अधोरेखित केली

## पार्थ पवारांचा मामेभाऊ दिग्विजय पाटीलला अटक होणार? मुंढवा जमीन घोटाळा प्रकरणात अटकपूर्व जामीन अर्ज मागे

पुणे । प्रतिनिधी

मुंढवा जमीन घोटाळा प्रकरणात गुन्हा दाखल असलेल्या दिग्विजय पाटीलने पुणे सत्र न्यायालयातील त्याचा अटकपूर्व जामीन अर्ज मागे घेतला आहे. दिग्विजय पाटीलने त्याच्यावर गुन्हा दाखल झाल्यानंतर अटकपूर्व जामीन अर्ज दाखल केला केला होता. मात्र या प्रकरणात पोलिसांनी दोषारोपपत्र दाखल केल्यानंतर नवीन मुद्यांच्या आधारे पुन्हा अटकपूर्व जामीन अर्ज दाखल करण्यासाठी दिग्विजय पाटीलने आधी केलेला अर्ज मागे घेतल्याची माहिती आहे. दिग्विजय पाटील हा पार्थ पवार यांचा मामेभाऊ आहे.



दिग्विजय पाटीलकडून या प्रकरणात वेळकाढूपणा करण्याचा हा प्रयत्न मानला जात आहे. दिग्विजय पाटीलने आधी केलेला अर्ज मागे घेतल्याने नियमानुसार पुणे पोलीस दिग्विजय पाटीलला अटक करु शकतात. मात्र, पार्थ पवार यांचा नातेवाईक असलेल्या दिग्विजय पाटीलला पुणे पोलीस अटक करणार की त्याला नव्याने अटकपूर्व अर्ज दाखल करण्याची संधी देणार याकडे सगळ्यांचं लक्ष असणार आहे.


दरम्यान, मुंढवा जमीन घोटाळा प्रकरणात पार्थ पवार यांना क्लीन चिट मिळाल्याची चर्चा आहे. दुसरीकडे त्यांचा मामेभाऊ दिग्विजय पाटीलवर मात्र अटकेची टांगती तलवार असल्याचं पाहायला मिळत आहे. राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे पुत्र पार्थ पवार यांना पुण्यातील मुंढवा जमीन घोटाळाप्रकरणी खारगे समितीकडून क्लीन चिट देण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे या प्रकरणात पार्थ पवार यांना मोठा दिलासा मिळाल्याचे मानले जात आहे.

या जमीन व्यवहार प्रकरणात पार्थ पवार यांची स्वाक्षरी नसल्याने जमीन खरेदीशी त्यांचा थेट संबंध नाही, असा निष्कर्ष याप्रकरणाच्या चौकशीसाठी नेमण्यात आलेल्या विकास खारगे यांच्या समितीने काढला आहे. त्यामुळे पार्थ पवार यांना अभय मिळाल्याचे सांगितले जात आहे.

## भाजपा प्रदेश सरचिटणीसपदी राजेश पांडे यांची नियुक्ती

पुणे । प्रतिनिधी

भारतीय जनता पक्षाच्या संघटनात्मक बांधणीत मोलाचे योगदान देणारे व पुणे पुस्तक महोत्सवाचे मुख्य संयोजक राजेश पांडे यांची पक्षाच्या प्रदेश सरचिटणीस पदी नियुक्ती करण्यात आली आहे. पक्षाचे राष्ट्रीय सरचिटणीस (संघटन) बी. एल. संतोष यांच्या उपस्थितीत पक्षाचे अध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी याबद्दल अधिकृत घोषणा केली.



राजेश पांडे यांना चंद्रशेखर बावनकुळे अध्यक्ष असतांना लोकसभा निवडणुकी दरम्यान सरचिटणीस म्हणून जबाबदारी देण्यात आली होती. आता भाजपचे नवे अध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या सरचिटणीस टीममध्येही राजेश पांडे यांची वर्णी लागली आहे. राजेश पांडे यांच्यासह निरंजन डावखरे, योगेश सागर, संजय कुटे, माधवी नाई आणि सुनील राणे हे सरचिटणीस म्हणून रवींद्र चव्हाण यांच्यासोबत काम करतील.

भाजपचे महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस असलेले राजेश पांडे ४० वर्षांहून अधिक काळ सामाजिक, शैक्षणिक आणि राजकीय क्षेत्रात सक्रिय असून अभ्यासू, मितभाषी, उत्तम संघटक आणि नावीन्यपूर्ण लोकसहभाग उपक्रम राबविणारे अशी पांडे यांची ओळख आहे. यानिमित्ताने राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या विचारांच्या मुशीत वाढलेला, विद्यार्थी चळवळीत तयार झालेला कुशल संघटक आणि निष्ठावान चेहऱ्याला पक्षाने संधी दिली अशी भावना भाजपच्या कार्यकर्त्यांमधून उमटत आहे.

## ओतूरमध्ये दिवसाढवळ्या बिबट्याचा संचार; शेतकरी भयभीत

ओतूर: ओतूर (ता.जुन्नर) हद्दीतील गाढवे पटात बिबट्याचा दिवसा संचार होत असल्याने शेतकरी व ग्रामस्थांमध्ये यांनी भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. संदीप बबन गाढवे यांच्या शेतातील गहू व कांद्याच्या पिकामध्ये बिबट्या मुक्तपणे फिरताना अनेकांना दिसल्याची घटना मंगळवारी (दि.२४) सकाळी ९ वाजण्याच्या दरम्यान घडली असून दीपक गाढवे या शेतकऱ्याने याबाबत माहिती दिली आहे.



मंगळवारी सकाळच्या सुमारास शेतात काम करणाऱ्या शेतकऱ्यांना अचानक बिबट्या दिसून आला. काही शेतकऱ्यांनी प्रसंगावधान राखत सुरक्षित अंतरावरून मोबाईलमध्ये त्याचा व्हिडिओ चित्रित केला. हा व्हिडिओ परिसरात वेगाने व्हायरल होत असून ग्रामस्थांमध्ये दहशतीचे वातावरण निर्माण झाले आहे. गाढवे पट भागात दाट लोकवस्ती आहे,आता बिबट्या दिवसाही वस्तीच्या जवळ दिसत असल्याने शेतकरी शेतात जाण्यास घाबरत आहेत. विशेषतः लहान मुले व जनावरांच्या सुरक्षेबाबत चिंता व्यक्त केली जात आहे.परिसरात दाट उस, गहू व कांद्याची शेती असल्याने वन्यप्राण्यांना लपण्यासाठी अनुकूल परिस्थिती निर्माण झाल्याचे स्थानिकांचे मत आहे. वनविभागाने या घटनेची तातडीने दखल घेऊन परिसरात पाहणी करावी, पिंजरा लावून बिबट्याला जेरबंद करावे तसेच ग्रामस्थांना सतर्कतेच्या सूचना द्याव्यात, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. दरम्यान, ग्रामस्थांनी एकटे शेतात न जाणे, लहान मुलांना बाहेर सोडू नये व रात्रीच्या वेळी विशेष दक्षता घ्यावी, असे आवाहन वनविभागाच्या वतीने करण्यात येत आहे.

## आमच्या मुलीसोबत मैत्री करायची लायकी आहे का?' म्हणत तरुणाला बेदम मारहाण

पुणे: प्रेमप्रकरणाच्या संशयावरुन तरुणाला बेदम मारहाण करण्यात आल्याची घटना भवानी पेठेतील कासेवाडी भागात घडली. या प्रकरणी एकाला अटक करण्यात आली असून, साथीदारांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला.

अमन सुभाष मोरे (वय २६, सध्या रा. दत्तवाडी, मूळ रा. कासेवाडी, भवानी पेठ) असे जखमी झालेल्याचे नाव आहे. या प्रकरणी अल्तमश नासीर शेख (रा. कासेवाडी, भवानी पेठ) याला अटक करण्यात आली आहे. त्याच्याबरोबर असलेल्या साथीदारांविरुद्ध गुन्हा दाखल करणत आला आहे.


पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अमन याचे एका तरुणीशी प्रेमसंबंध असल्याचा संशय शेख याला होता. अमन आणि त्याची मैत्रीण हे २३ फेब्रुवारी रोजी सिंहगडावर फिरायाल निघाले होते. अमनच्या मैत्रिणीचे डोके दुखत असल्याने ते एका औषध विक्री दुकानात गेले. डोके दुखीवर त्यांनी गोळ्या घेतल्या. त्यानंतर आरोपी शेख आणि आठ ते दहा साथीदार तेथे आले. 'तू कोठे चालला आहे. आमच्या मुलीसोबत मैत्री करायची. तुझी लायकी आहे का', अशी विचारणा करुन अमनला दुचाकीवरुन भवानी पेठेतील कासेवाडी परिसरात नेले.

तेथील एका इमारतीच्या तळमजल्यावरील पार्किंगमध्ये अमनला गजाने बेदम मारहाण केली. जखमी अवस्थेतील अमनला महात्मा फुले स्मारक परिसरात सोडून आरोपी शेख आणि साथीदार पसार झाले. जखमी अवस्थेतील अमनने खडक पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. रात्री उशीरा आरोपी शेख याला अटक करण्यात आली. पोलीस उपनिरीक्षक कांबळे तपास करत आहेत.

## पुणे रेल्वे स्टेशनवरील हॉटेलमध्ये आग; मोठी दुर्घटना टळली

पुणे । प्रतिनिधी

पुणे रेल्वे स्टेशन येथील फलाट क्रमांक एकवरील एका हॉटेलमध्ये सोमवारी अचानक आग लागल्याची घटना घडली. घटनेमुळे काही काळ परिसरात घबराट पसरली होती. मात्र अग्निशमन दलाच्या तात्काळ हस्तक्षेपामुळे मोठी दुर्घटना टळली.



मिळालेल्या माहितीनुसार, फलाट क्रमांक एकवरील खाद्यपदार्थांच्या हॉटेलमध्ये शॉर्टसर्किटमुळे आग लागल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. धुराचे लोट बाहेर येऊ लागल्याने प्रवासी व विक्रेत्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले. स्टेशन प्रशासनाने तत्काळ सतर्कता बाळगत परिसर रिकामा केला. घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दलाच्या गाड्या काही मिनिटांत घटनास्थळी दाखल झाल्या. जवानांनी तत्परतेने पाण्याचा मारा करत आगीवर नियंत्रण मिळवले. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नसून कोणालाही दुखापत झालेली नाही.

आगीत हॉटेलमधील काही साहित्य व उपकरणांचे नुकसान झाले आहे. घटनेनंतर रेल्वे प्रशासनाने सुरक्षेच्या दृष्टीने विद्युत यंत्रणेची तपासणी सुरू केली असून पुढील चौकशी केली जात आहे. दरम्यान, फलाटावरील रेल्वे वाहतूक काही काळ सावधगिरी म्हणून नियंत्रित करण्यात आली होती. मात्र परिस्थिती सुरळीत झाल्यानंतर वाहतूक पूर्ववत करण्यात आली.